# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०८ मार्च, २०१७ / फाल्गुन १७, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८५**

---

**औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचारी भरतीस मान्यता देणेबाबत**

**(१) * २८८९८ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २१७८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेची स्थापना सन १९८४ साली झाली असून वर्ग १ ते वर्ग ४ ची ४१४४ पदे मंजुर आहेत व महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर सन १९९१ साली कर्मचारी भरती झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर असलेल्या ४१४४ पदापैकी ४८० पदे रिक्त असून पुढील दोन वर्षात ३०% कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आकृतीबंधानुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असलेली नवीन १५०० पदास शासन मान्यता देणार आहे काय,

(४) असल्यास, राज्यात इतर “क” वर्ग महानगरपालिकेत ७५०० ते ८००० कर्मचारी कार्यरत आहेत, त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील पदांना मान्यता देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गात ४१४४ मंजूर पदे असून, महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी कर्मचारी भरती करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेने आकृतीबंधास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता.

मात्र, सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली नसल्याने, सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सादर करण्याबाबत दिनांक २९/१/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने प्रस्ताव प्राप्त झाल्यावर, त्यावर शासन उचित निर्णय घेईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत

**(२) * २७९२८ ॲड.अनिल परब, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक १४६८५ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनासंदर्भात निर्णय न घेतल्याने कुर्ला येथील झोपडपट्टीवासियांनी दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी पासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विमानतळ परिसरात सुरक्षेला असणारा धोका, धावपट्टीचे विस्तारीकरण आणि सुशोभिकरणाच्या नावाखाली राबविण्यात येत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पात विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासियांनाच डावलण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमानतळ प्राधिकरणाच्या जागेतच झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन केले जाईल अशी आश्वासने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कुर्ला येथील संदेश नगर व क्रांती नगर बैलबाजार रहिवाशांच्यावतीने झोपडपट्टी चळवळ या संस्थेचे अध्यक्ष श्री. घनश्याम भापकर यांनी दिनांक ३/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १३/१/२०१७ पासून बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यालयास दिलेला आहे.

(२) व (३) शासनाने छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने विनियम अंतर्भूत करणेचा निर्णय घेतलेला आहे.

सदर प्रारुप विनियमावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये दिनांक ९/९/२०१४ रोजी नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणेत आलेल्या आहेत. त्यामध्ये १) in-situ पुनर्वसन, २) अधिसूचित क्षेत्रामध्ये इतरत्र पुनर्वसन, ३) बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये व मुंबई महानगर प्रदेशामध्ये इतरत्र पुनर्वसन अशा पर्यायानुसार विमानतळावरील जागेमध्ये झोपडपट्टी पुनवर्सन योजना राबविणेबाबतची तरतूद प्रस्तावित आहे.

विमानतळ परिसरातील इमारतींच्या उंचीवरील निर्बंध, जागेच्या उपलब्धतेवरील मर्यादा याचा विचार करता शक्य तेथवर अधिकाधिक झोपडपट्टीधारकांचे अधिसूचित क्षेत्रामध्ये पुनर्वसन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यामध्ये झोपडपट्टीवासीयांना डावलले असल्याची बाब नाही.

(४) व (५) झोपडपट्टी पुनर्वसनासाठी प्रथमत: झोपडपट्टयांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. विमानतळ अधिसूचित क्षेत्रामधील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण अद्यापही झालेले नसल्याने विमानतळ अधिसूचित क्षेत्रामधील अंदाजे ३५ झोपडपट्टयांपैकी (slum pockets), १४ झोपडपट्टयांचे सर्वेक्षणाचे काम त्वरेने पाच महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे आदेश अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण), मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देणेत आलेले आहे. त्या अनुषंगाने संबंधित प्राधिकरणाकडून सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

**भिवपुरी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील समृध्दी कॉम्प्लेक्स गृहनिर्माण सहकारी संस्थेतील शेकडो रहिवाशांची विकासकाने फसवणूक केल्याबाबत**

**(३) * २८१३३ श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवपुरी (ता.कर्जत, जि.रायगड) स्टेशनजवळ उभारण्यात आलेल्या समृध्दी कॉम्प्लेक्स गृहनिर्माण सहकारी संस्थेतील शेकडो रहिवाशांची फसवणूक केल्याप्रकरणी विकासकाविरूध्द कर्जत पोलीस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास रहिवाशांनी दाखल केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी विकासकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू गृहनिर्माण प्रकल्पात फसवणूक झालेल्या रहिवाशांना मुलभूत सोय-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी विकासकाविरुद्ध कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११९/२०१६ भा.दं.वि.सं.क. ४२०, ५०६, मोफा कायदा कलम ३, ४, ५, ७, ११, १२(अ) अन्वये दिनांक १०/०७/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) सदर गृहनिर्माण प्रकल्पातील कुटुंबियांना दिवाबत्ती व कचरा उचलण्याच्या सोयीसुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तथापि, सदर वसाहतीमधील कुटुंबियांना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित विकासकाची आहे. सदरच्या सोयीसुविधा विकासकाने पुरविल्या नसल्याने तसेच फसवणुक केली असल्यामुळे विकासकावर कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११९/२०१६ भा.दं.वि.सं.क. ४२०, ५०६, मोफा कायदा कलम ३, ४, ५, ७, ११, १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र**
**कल्याणकारी मंडळ स्थापन करणेबाबत**

**(४) * २६७७३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६२९८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा असा आदेश मा.कामगार व वस्त्रोद्योग राज्यमंत्री यांनी कामगार विभागाला माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी तत्कालीन राज्यमंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला असुन त्या अहवालाच्या आधारे विविध विभागांचे अभिप्राय नोंदविले आहेत. दरम्यान दिनांक २०/०४/२०१६ रोजी मा. मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ अंतर्गत महाराष्ट्र राज्य असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन झाल्यावर त्यामध्ये यंत्रमाग कामगारांचा प्राथम्याने विचार केला जाणार आहे .

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील कुलाबा, फोर्ट परिसरात कंत्राटदार वाहनचालकांकडून बेकायदा शुल्क वसूल करीत असल्याबाबत

**(५) * २८९९० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील कुलाबा, फोर्ट परिसरातील ३९ वाहनतळांवर विनाशुल्क वाहन उभी करण्याची मुभा महानगरपालिकेने वाहन चालकांना दिली, परंतु याठिकाणी कंत्राटदारांनी महानगरपालिकेचे आदेश धुडकावून वाहनचालकांकडून बेकायदा शुल्क वसूली करण्यात आल्याची बाब दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे नरीमन पॉईंट येथील व्ही.व्ही.राव मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा वाहनतळांवर वाहन लावण्याकरिता कंत्राटदाराकडून एका तासासाठी ३० रुपये तर संपूर्ण दिवसासाठी ९० रुपये याप्रमाणे बेकायदा शुल्क आकारुन वाहनचालकांची आर्थिक फसवणूक सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणच्या मोफत वाहनतळावर बेकायदा वसुली करणाऱ्या कंत्राटदारावर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने लक्ष देणे गरजेचे असतानाही महानगरपालिका याबाबीकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाहनचालकांची फसवणूक करणाऱ्यांवर व या कंत्राटदाराशी संगनमत करणाऱ्या महापालिकेच्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'ए' विभागातील ३५ नि:शुल्क वाहनतळांवर "नि:शुल्क वाहनतळ" असे नमुद केलेले फलक लावण्यात आलेले आहेत.

अशा नि:शुल्क वाहनतळांवर कंत्राटदार वसुली करीत नसून काही असामाजिक तत्व वसुली करतात व अशा प्रकाराच्या अनेक तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या असून, वेळोवेळी स्थानिक पोलीस स्थानकांना पत्रव्यवहार करुन सदर असामाजिक तत्वाच्या लोकांविरुध्द कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

नरीमन पॉईंट येथील व्ही.व्ही. राव मार्ग या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत कोणताही कंत्राटदार नियुक्त करण्यात आलेला नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी महापालिका दुर्लक्ष करीत आहे हे खरे नाही.

महानगरपालिकेमार्फत वाहनतळ नि:शुल्क असल्याबाबतचे फलक लावण्यात आलेले आहे. तसेच, स्थानिक पोलीस ठाणे यांना देखील नि:शुल्क वाहनतळांची माहिती देण्यात आलेली आहे.

तसेच, मरिन ड्राइव्ह पोलीस ठाणे येथे अनधिकृतरित्या वसुली करणा-यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तसेच, महानगरपालिकेच्या नि:शुल्क वाहनतळावर कोणत्याही असामाजिक तत्वांकडून पार्किंग शुल्काची वसुली होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत तसेच, याअनुषंगाने सुयोग्य नियोजन करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विमानतळावर ग्राऊंड हॅण्डलिंग एजंट म्हणून काम करणारी कंबाटा एव्हिएशन कंपनी बंद केल्याबाबत

**(६) * २७४७६ श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४६ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळावर ग्राऊंड हॅण्डलिंग एजंट म्हणून काम करणारी कंबाटा एव्हिएशन कंपनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अचानकरित्या बंद करण्यात आली असून सुमारे २१०० कामगारांचे दहा महिन्याचे वेतन व इतर देणी थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कामगारांचे थकीत वेतन व इतर देणी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) कंबाटा एव्हिएशन या कंपनीच्या व्यवस्थापनाने आस्थापना बंद करीत असल्याबाबतची कायदेशीर नोटीस अद्यापपर्यंत दिलेली नसली तरी कंपनीचे कामकाज माहे ऑगस्ट, २०१६ पासुन बंद झाले असुन माहे मार्च, २०१६ पासुन कामगारांचे थकित वेतन अदा करण्यात आलेले नाही, हे खरे आहे.

(२) होय, कामगार आयुक्त, केंद्रीय श्रम आयुक्त, भविष्य निर्वाह निधी या संबंधित कार्यालयांनी उक्त प्रकरणाची चौकशी केली असुन व्यवस्थापनाने मार्च, २०१६ पासुन कामगारांचे थकित वेतन व भत्ते अदा केले नसल्यामुळे व्यवस्थापनाविरुद्ध विविध अधिनियमांतर्गत खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच मा.औद्योगिक न्यायालयाच्या आदेशांनुसार कंपनीची मालमत्ता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जप्त करुन वसूलीची कार्यवाही सुरु केली आहे.

दरम्यान कामगारांचे थकित वेतन व इतर कायदेशीर रकमा वसूल होण्याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी, याकरिता शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार केंद्रीय श्रम आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली असुन या समितीमार्फत कामगारांचे थकित वेतन व इतर भत्ते मिळवून देण्यासंदर्भात प्रयत्न सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(७) * २८१०७ श्री.जयंत पाटील, श्री.नारायण राणे, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २४५४० ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्यदिव्य स्मारक उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्मारकाच्या बांधकामाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टीडीआरचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अखत्यारितील एनटीसीने उक्त स्मारकासाठी आवश्यक असलेल्या जागेचा ताबा देणेत आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त स्मारक उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

केंद्र शासन पर्यावरण व वन मंत्रालयाने प्रस्तावित स्मारकाचे बांधकाम अनुज्ञेय होणेसाठी दिनांक २३/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सीआरझेडच्या दिनांक ६/१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा केलेली आहे.
(३) ते (५) प्रस्तुत प्रकरणी मंजूर विकास योजनेमध्ये स्मारकाच्या आरक्षणाचे निर्माण झाल्याशिवाय नियमानुसार हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) देय होत नसल्याने इंदू मिलच्या जागेवरील सीआरझेड बाहेरील क्षेत्रावरील आरक्षणाच्या निर्माणाच्या संदर्भात विकास योजनेमध्ये मंजूर फेरबदलाची अधिसूचना दिनांक २१/११/२०१६ रोजी निर्गमित करणेत आलेली आहे. तर सीआरझेड क्षेत्रासंदर्भातील अधिसूचना केंद्र शासन पर्यावरण वन मंत्रालयाकडील दिनांक २३/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनंतर दिनांक ५/१/२०१७ रोजी निर्गमित केलेली आहे. त्यामुळे हस्तांतरणीय विकास हक्काचे मोबदल्यामध्ये राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून (NTC) जागेचा ताबा घेणेचा मार्ग मोकळा झालेला आहे.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळास हस्तांतरणीय विकास हक्काचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर करणेबाबत तसेच शासनाच्यावतीने संदर्भाधीन जागेचा ताबा घेणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देणेत आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून कार्यवाही पूर्ण झालेनंतर मालकी हक्काच्या अभिलेखामध्ये फेरफार नोंदी सत्वर घेणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक २०/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनाची मान्यता घेवून नियुक्त केलेले सल्लागार श्री. शशी प्रभू यांनी प्रस्तावित स्मारकाचे आराखडे तयार केलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्व संबंधीत व्यक्ती आणि संस्था यांच्याशी चर्चा करुन आराखडे अंतिम करण्यासाठी गठीत करणेत आलेल्या मा.मंत्री (सामाजिक न्याय) एकसदस्यीय समितीने सदर आराखडे अंतिम केलेले आहेत. त्यानुषंगाने आता पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

-----------------

**पुणे महापालिकेच्या औंध येथील जकात नाक्यावरील वास्तूची दुरवस्था झाल्याबाबत**

**(८) * २७०४९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या औंध येथील जकात नाक्यावरील वास्तूची दुरवस्था झाली असून सदर वास्तूतील जप्त केलेला माल चोरीस गेल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जकात नाक्याच्या वास्तुची दुरुस्ती तसेच तेथे ठेवण्यात येणाऱ्या मालाच्या रक्षणाकरिता सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) औंध येथील नाक्याच्या वास्तूमधील दोन खोल्यांमध्ये जप्त करण्यात आलेला माल ठेवण्यात आला होता. त्यापैकी बहुतांश माल डिसेंबर, २०१६ मध्ये चोरीस गेलेला आहे, हे खरे आहे.

सदर मालाची चोरी झाल्याबाबत दिनांक २८/१२/२०१६ रोजी चतुश्रृंगी पोलीस ठाण्यातील औंध पोलीस चौकीमध्ये रितसर तक्रार दाखल केली असून त्यांचेकडून पुढील चौकशी चालू आहे.

सदर जकात नाक्याच्या वास्तूमधील २ खोल्यांच्या नादुरुस्त दरवाज्यांची दुरुस्ती करण्यात आलेली असून शिल्लक राहिलेला माल भांडार विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदर खोल्या पूर्णपणे रिकाम्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेचे भाडेपट्टीवर भूखंड घेतलेले खाजगी रुग्णालयाच्या प्रशासनाकडून गरिबांना सेवा नाकारीत असल्याबाबत**

**(९) * २८२८२ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय खाजगी भागीदारीत नाममात्र भाडेपट्टीवर महानगरपालिकेचे भूखंड घेवून त्यावर प्रसूतिगृह बांधल्यानंतर खाजगी रुग्णालय प्रशासन गरिबांना सेवा नाकारत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी २० ऐवजी ४० टक्के बेडस राखून ठेवण्याच्या धोरणाला महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सदर रुग्णालयांना सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत (पी.पी.पी.) केलेल्या सामंजस्य करारानुसार महानगरपालिकेच्या भूखंडावरील सेव्हन हिल्स रुग्णालय व ब्रम्हकुमारी रुग्णालय तसेच, महानगरपालिकेच्या इमारतीतील १३ प्रसुतीगृहांमध्ये महानगरपालिका रुग्णांना सेवा देणे बंधनकारक आहे.

तथापि, रुग्णालय प्रशासनाकडून सेवा नाकारल्या जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होतात ही वस्तुस्थिती आहे.

(२) सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत येणाऱ्या प्रसुतीगृह आणि रुग्णालयांसाठी खालीलप्रमाणे सुधारीत अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या असून त्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे :-

- ३०% खाटांवर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या नाममात्र दरात प्रसुतीसेवा
- ५% खाटांवर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या नाममात्र दरात एन.आय.सी.यु. (NICU) सेवा
- ५% खाटांवर शासनमान्य विमा दरात एन.आय.सी.यु. (NICU) सेवा
- ४०% खाटांवर शासनमान्य विमा दरात इतर वैद्यकीय सेवा
- २०% खाटांवर शासनमान्य विमा दराच्या २५% सवलतीने इतर वैद्यकीय सेवा

(३) व (४) या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- ब्रम्हकुमारी रुग्णालयाने करारभंग केल्यामुळे महानगरपालिकेमार्फत त्यांना दिनांक २२/०७/२०१६ रोजी देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसबाबत त्यांचे म्हणणे प्राप्त झाले असून, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यासंदर्भात सुनावणी घेण्यात येणार आहे.
- सेव्हन हिल्स रुग्णालय यांनी केलेल्या अनियमिततेच्या संदर्भात दिनांक १७/०४/२०१५ रोजी दिलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने प्राप्त झालेला खुलासा अस्वीकृत करण्यात आला असून, महानगरपालिकेमार्फत पुढील कारवाई करण्यात येत आहे.
- सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत येणाऱ्या ९ संस्थांनी करारभंग केला आहे. यापैकी २ संस्थांचा करार कालावधी संपला असून, सुधारीत धोरणातील अटी व शर्ती मान्य असल्यास, त्यांच्या कराराचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल. अन्यथा, अशा संस्थांना देण्यात आलेल्या जागेतून निष्कासित करण्यात येईल.
- करारभंग केलेल्या ज्या ७ संस्थांचा करार कालावधी संपलेला नाही अशा संस्थांना सुधारीत अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांच्यासमवेत नव्याने करार करण्यात येईल अन्यथा त्यांना निष्कासित करण्यात येईल.
- उर्वरित ४ प्रसुतीगृहांनी करारभंग केला नव्हता, त्यापैकी एका प्रसुतीगृहाचा करार कालावधी संपुष्टात आला असून, नवीन धोरणातील अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांच्या कराराचे नुतनीकरण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
- करारभंग न केलेल्या ३ प्रसुतीगृहांना सुधारीत अटी व शर्ती स्विकारण्याचा विकल्प राहील.

-----------------

## चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यात चोरट्या मार्गाने जाणाऱ्या दारुवर अंकुश लावण्याबाबत

**(१) * २९०९६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आलेली असून चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आल्यापासून चोरट्या दारुचे प्रमाणात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोज विविध मार्गाने चोरटी दारु चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यात निर्यात करण्यात येते, यातील काही प्रमाणातील दारु पोलिसांद्वारे जप्त करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांमध्ये चोरट्या मार्गाने जाणाऱ्या दारुवर अंकुश लावण्याकरीता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आल्यापासून चोरट्या दारुच्या प्रमाणात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. परंतु, चंद्रपूर जिल्ह्यात संपुर्णपणे दारुबंदी असल्याने लपूनछपून दारु विक्री करीत असल्याचे गोपनिय माहिती मिळाल्याने तसेच जनतेच्या सहकार्याने अवैध दारुविक्री किंवा ने-आण बाबत माहिती मिळाल्यास पोलिसांमार्फत तात्काळ कार्यवाही केली जाते.

(२) चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यात चोरट्या मार्गाने आणलेली दारु जप्त करण्यात आल्याची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

**<u>चंद्रपूर जिल्हा</u>** :- चंद्रपूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये अवैध दारुबाबत एकूण ६५६ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ६७४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून रु.३,३८,३६,००२/- किंमतीची १७७०३ लिटर दारु, ३४ चार चाकी वाहने, ७५ दुचाकी वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**<u>वर्धा जिल्हा</u>** :- वर्धा जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये अवैध दारुबाबत एकूण ९१८ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ९५५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून रु.६६,७१,४९७/- किंमतीची अवैध दारु व चारचाकी वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यामध्ये चोरट्या मार्गाने जाणाऱ्या दारुवर अंकुश लावण्याकरिता केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१६ मध्ये मुंबई दारुबंदी कायदा कलम ९३ अंतर्गत एकूण ८९१ प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे.

वर्धा जिल्ह्यामध्ये सन २०१६ मध्ये मुंबई दारुबंदी कायदा कलम ९३ अंतर्गत एकूण ११५३ प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे राज्यातील अवैध दारु विक्री व निर्मिती बंद करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक २१/०७/२०१६ व दिनांक २९/०८/२०१६ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व घटक प्रमुखांना सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे गृह विभागाच्या दिनांक ०१/०३/२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये अवैध दारुविक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबींसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येऊर (जि.ठाणे) येथील सुपर ड्रिम रिअल इस्टेट प्रा.लि. यांनी अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(११) * २६७१६ श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २३४८१ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.१२/२, ३ या भुखंडावर सुपर ड्रिम रिअल इस्टेट प्रा.लि. यांनी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुखंडावरील इमारतीचे नकाशे ठाणे महानगरपालिकेमार्फत मंजूर केलेले नसताना देखील या भुखंडावर महानगरपालिकेतील अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने विकासकाने या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनियमितता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राप्त झाली होती.

(२) सदर भुखंडावरील इमारतीचे नकाशे ठाणे महानगरपालिकेने मंजूर केलेले नाहीत. या जागेवर कंपाऊंडवॉल, लोखंडी गेट व १७ x २० फुट आकाराचे पक्के बांधकाम केल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांचे निदर्शनास आले.

(३) सदर प्रकरणी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना चौकशी करुन ३ आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या यापूर्वी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अहवाल तात्काळ सादर करण्याविषयी सुचित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याच्या समुद्र किनारपट्टीवर प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१२) * २६७५७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या समुद्र किनारपट्टीवर प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे व भाऊचा धक्का ते रेवस (अलिबाग) येथे जाणाऱ्या बोटीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त मोटार सायकलींची वाहतूक केली जात असून येथील २०० बोटीपैकी ९० टक्के बोटी भंगार व कालबाहय झाल्या असल्याने प्रवाशांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोटार सायकल वाहतुकीचा कोणताही पावती पुरावा प्रवाशांना मिळत नसल्याने शासनास याचा महसूल मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवासी वाहतुक करणाऱ्या बोटी भंगार व कालबाहय झाल्या असल्याने त्यांच्या नुतनीकरणाबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रवासी बोटीतून वाहतूक करण्यात येणाऱ्या (पाळीव प्राणी, वाहने, माल इत्यादीकरीता) सुधारीत तिकीट दर आणि तिकीट दराच्या १० टक्के ट्रान्सशिपमेंट कर आकारण्याबाबत अधिसूचना निर्गमित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) कालबाहय झालेल्या प्रवासी बोटींच्या नुतनीकरणाबाबत कोणतेही धोरण अस्तित्वात नाही.

इनलँड व्हेसल ॲक्ट १९१७ मधील तरतुदीनुसार बोटींचे सर्व्हेक्षण करुन प्रवासी बोट वाहतुकीसाठी सक्षम (Seaworthy) असल्याबाबत सर्व्हे प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर प्रवासी परवाना निर्गमित करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घारापुरी बेटाभोवती संरक्षक भिंत उभारण्याबाबत

**(१३) * २६७४७ श्री.नारायण राणे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जेएनपीटी बंदराच्या वाढत्या भरावांच्या कामांमुळे समुद्रातील पाण्याची पातळी मोठया प्रमाणात वाढत चालली असून त्यामुळे जागतिक किर्तीच्या घारापुरी बेटावरील समुद्र किनारपट्टीचे बांध-बंदिस्ती, संरक्षक तट, सागरी लाटांमुळे उध्वस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेटाभोवती संरक्षक भिंत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. जे.एन.पी.टी. बंदरामार्फत टर्मिनल ४ चा विकास करण्यात येत असुन त्यासाठी सेंट्रल वॉटर रिसर्च सेंटर (CWPRS) या संस्थेमार्फत अभ्यास करण्यात आला आहे. सदर अभ्यासानुसार घारापुरी बेटाच्या क्षेत्रात कोणताही विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. असे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी कळविले आहे.

(२) व (३) संरक्षक भिंत उभारण्याबाबत एलिफंटा गावकऱ्यांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव तपासण्यात येत असल्याचे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी कळविले आहे.

-----------------

## मुंबई पोलीस जिमखाना येथे माजी गृहमंत्री स्व.आर.आर.पाटील यांचे स्मारक बांधण्याबाबत

**(१४) * २७१६० श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्दयाद्वारे माजी गृहमंत्री स्व. आर.आर. ऊर्फ आबा पाटील यांचे स्मारक मुंबई येथील पोलीस जिमखाना येथे बांधण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चेच्या वेळी मा.सभापती महोदय यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल व स्मारक बांधण्याबाबत सहानुभूतिपुर्वक विचार शासन करेल असे उत्तर दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित स्मारकाचा बृहत आराखडा तयार करण्यात येणार आहे काय, स्मारकासाठी किती निधीची आवश्कता आहे व त्याकरिता शासन केव्हापर्यंत निधी उपलब्ध करून देणार आहे,

(३) असल्यास, सदरहू बांधकाम केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार नगरपरिषदेने आय.एच.एस.डी.पी योजनेंतर्गत बांधलेल्या घरकुलांचा अपात्र लोकांनी ताबा घेतल्याबाबत

**(१५) * २९००९ श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक २४६६७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आय.एच.एस.डी.पी. योजनेंतर्गत नगरपरिषद, नंदुरबार यांनी बांधलेल्या घरकुलांचा बेकायदेशीर ताबा घेतलेल्या अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले खाली करण्याबाबत कार्यवाहीकरिता सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले रिकामी करुन घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय. शासन पत्र दिनांक २८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले रिकामी करुन घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ अखेर पर्यंत करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना दिलेले आहेत.
(३) दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व संबंधितांची बैठक घेवून घरकूले रिकाम्या करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

संबंधित बेकायदेशीर ताबा घेतलेल्या लोकांना जिल्हा प्रशासन व नगर परिषद यांनी वेळोवेळी आवाहन करुन दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी सदर घरकुले खाली करुन घेतलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ च्या हद्दित अल्पवयीन मुले बेपत्ता होत असल्याबाबत

**(१६) * २८००७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ च्या हद्दित अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून स्वप्नाली मनोज मल्लाव, संतोष सिध्दाराम धोत्रे व विनायक महिंद्रा खांडेकर या मुलांच्या अपहरणाच्या घटना घडल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आमिष दाखवून पळवून नेणाऱ्यांवर नातेवाईकांनी संशय व्यक्त केल्यानंतरही अथवा संशयित व्यक्तींची नावे पोलिसांकडे देऊनही पोलीस दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेपत्ता मुलांचा शोध घेणे, अल्पवयीन मुलांचे पळवून नेण्याचे प्रमाण सतत वाढत असतांना व पोलिसांना संशयितांची नावे देऊनही कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या पोलिसांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-३ च्या हद्दीत सन २०१५ मध्ये २४१ मुले बेपत्ता झाली होती त्या पैकी २२३ मुले मिळून आली. सन २०१६ मध्ये २८७ मुले बेपत्ता झाली होती त्या पैकी २५४ मुलें मिळून आली व सन २०१७ मध्ये जानेवारी अखेर ४० मुले बेपत्ता झाली होती त्यापैकी २३ मुले मिळून आली आहेत.

(अ) स्वप्नाली मनोज मल्लाव हिच्या बेपत्ता होण्यासंदर्भात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन दोन आरोपीं विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.११४/२०१६ भा.दं.वि.क.३६३, ३६६ (अ), ३८४, ५०६ (२), ३४ शस्त्र अधिनियम ३ (२५) पॉस्को कलम ७, १६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात एका आरोपीस अटक करण्यात आली असून दुसऱ्या आरोपीचा शोध सुरु आहे. गुन्हा तपासावर आहे.

(ब) संतोष सिद्धराम धोत्रे याच्या बेपत्ता होण्यासंदर्भात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.४६८/२०१६, भा.दं.वि.क.३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, सदर मुलगा रागाच्या भरात निघून गेला होता व त्याचा राग शांत झाल्यानंतर तो सुखरुप घरी परत आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा "क " फायनल रिर्पोट मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

(क) विनायक महेंद्रा खांडेकर याच्या बेपत्ता होण्यासंदर्भात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पिंपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.४/२०१७ भा.दं.वि.क. ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, सदर मुलगा त्याच्याजवळील मोबाईल गहाळ झाल्याने घाबरुन घरी न जाता हडपसरला गेल्याचे व त्याच्याकडील पैसे संपल्यानंतर दिनांक ०४/०१/२०१७ रोजी घरी परत आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा "क" फायनल रिर्पोट मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत**

**(१७) * २७३८९ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९९८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे टाटा मेमोरियल सेंटर या संस्थेच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेतर्फे कर्करोग रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्क रुग्णालयासाठी महानगरपालिकेने देऊ केलेल्या कोलशेत येथील भूखंडाप्रकरणी क्लॅरियंट कंपनीच्या विकासकांनी मा.उच्च न्यायालयात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान याचिका दाखल केली असल्यामुळे कर्करोग रुग्णालयासाठी प्रस्तावित भूखंड ठाणे महानगरपालिकेने वितरित केला नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सुविधा भूखंडासंदर्भात क्लॅरियंट कंपनीच्या विकासकाने कोणत्या आधारे न्यायालयात याचिका सादर केली आहे, तसेच सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने दाखल करुन घेतली आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावित सुविधा भूखंड जर अगोदरच वितरित केला होता मग त्याठिकाणी कर्करोग रुग्णालयासाठी जागा कोणत्या अधिकाऱ्याने प्रस्तावित केली व कशाच्या आधारे, तसेच, शासनाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एकतरी कर्करोग रुग्णालय बांधण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरचा धोरणात्मक निर्णय विचारात घेता, ठाणे येथे कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) ठाणे महानगरपालिकेने विकास आराखडा रस्त्याचे क्षेत्र (डी.पी.रोड), सुविधा भूखंडातून वगळले असून त्याविरुध्द म्हणजेच विकास आराखडा रस्त्याचे क्षेत्र (डी.पी.रोड), सुविधा भूखंडात समाविष्ट करण्याची मागणी करणारी याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आली आहे.

(४) उक्त सुविधा भूखंड वितरीत करण्यात आलेला नाही.

राज्यात प्रत्येक जिल्हयात किमान एक तरी रुग्णालय उभारण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

(५) सदर सुविधा भूखंडाऐवजी अन्य भूखंड कर्करोग रुग्णालयाकरीता आरक्षित करण्याबाबतची शक्यता ठाणे महानगरपालिकेमार्फत तपासण्यात येत आहे.

-----------------

**उल्हासनगर येथील कचऱ्याची समस्या दूर करणेबाबत**

**(१८) * २९१४१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेचे शांतीनगर येथील डम्पिंग ग्राऊंड भरल्याने शहरात कचऱ्याची समस्या निर्माण होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी कचरा कुजून लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने यासंदर्भात शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शहरातील कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन १९९६-९७ पूर्वी शांतीनगर येथील जागेचा डंपिंग ग्राऊंड म्हणून उल्हासनगर नगरपालिकेमार्फत वापर करण्यात येत होता. तथापि, सन १९९६-९७ पासून शांतीनगर येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यात येत नसून तो राणा ट्रेडींग कंपनी जवळ म्हारळ गांव जवळील डंपिंग ग्राऊंडच्या जागेत टाकण्यात येत होता.

परंतु सदर डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपल्याने दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ०३/१०/२०१६ पासून खडी मशिन, गायकवाड पाडा येथील पडीत खाणीत कचरा टाकण्यात येत आहे.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेकडून शहरातील पूर्ण कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्यामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेस जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात ध्वनिप्रदुषण प्रतिबंधक कायद्यान्वये अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१९) * २८९३७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ध्वनिप्रदुषण प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ध्वनिमापक उपकरणे देण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ डिसेंबरच्या नाताळ सणापासून राज्यात प्रभावी कारवाई सुरु केली जाईल अशी ग्वाही शासनाने मा.मुंबई उच्च न्यायालयात देवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार ध्वनिप्रदूषण प्रतिबंधक कायद्यान्वये अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २५/१२/२०१६ ते ०१/०१/२०१७ या कालावधीत दूरध्वनी, गस्ती पथक व नियंत्रण कक्ष या माध्यमातून ४६ तक्रारी प्राप्त झाल्या. प्रत्येक तक्रारीवर तात्काळ दखल घेण्यात आली. परंतु तक्रारी नोंदविल्या ठिकाणी ध्वनीप्रदूषण आढळून आले नसल्याने कारवाई करण्यात आली नाही. ४६ तक्रारीपैकी १३ तक्रारींवर कारवाई करण्यात आली. १३ तक्रारींपैकी ५ तक्रारींच्या संदर्भात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात ध्वनीप्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच दिनांक २५/१२/२०१६ च्या सणापासून राज्यात प्रभावी कार्यवाही सुरु करण्याकरीता उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

१) ध्वनीप्रदूषणासंबंधी जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, चित्रपटगृहात क्लिपद्वारे तसेच वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे जनजागृती करण्यात येत असून ध्वनीप्रदूषण केल्यामुळे होणा-या शिक्षेबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात आली.

२) ध्वनीप्रदूषणासंदर्भातील तक्रारीबाबत प्राधिकृत केलेल्या पोलीस निरिक्षक दर्जाच्या अधिका-यांची नावे, पत्ते व इतर तपशील यांची प्रसिध्दी विविध माध्यमातून करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

३) ध्वनीप्रदूषणासंदर्भात राज्यात एकसूत्रीपणा आणण्यासाठी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ व ध्वनीप्रदूषण नियंत्रण (नियमन) नियम २००० अन्वये कारवाई करण्याकरीता प्रमाणित कार्यप्रणाली (स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग सिस्टीम) कार्यान्वित करण्यात आली आहे.

४) ध्वनीप्रदूषण नियंत्रणासाठी राज्यात सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात डायलिसिस केंद्रे सुरु करण्याबाबत**

**(२०) * २९०२७ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे रुग्णांना डायलिसिसचा उपचार त्वरीत मिळण्यासाठी शहरात विविध ठिकाणी डायलिसिसची १२ केंद्रे सुरु करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राद्वारे १९९ डायलिसिस यंत्राच्या सहाय्याने ३५० रुपयांहून कमी शुल्कात रुग्णांना सेवा मिळणार आहे, तसेच निवड झालेल्या संस्थांवर डायलिसिस यंत्र बसविणे व त्याची देखभाल दुरुस्ती, मनुष्यबळ यांची व्यवस्था करणे बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त डायलिसिस केंद्रे किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन तत्वावरील १२ डायलिसिस केंद्रे सुरु करण्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर १२ डायलिसिस केंद्रे कायदेशीर प्रक्रिया करुन यथाशीघ्र कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

----------------

**वरळी (मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंम्पिग केंद्रात**
**व्हॉल्वच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) * २९०७१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे समुद्रात जाणा-या सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी वरळी (मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंम्पिग केंद्रात १,४०० मि.मि. आकाराचा नाईट गेट व्हॉल्व बसवला जात असुन व्हॉल्वच्या खरेदीत गैरव्यवहार होत असल्याच्या आरोपामुळे मा.मुख्यमंत्री यांनी महापालिका आयुक्त, मुंबई यांना चौकशीचे आदेश दिले असल्याचे दिनांक ४ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेचे वरळी येथील सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र २५ वर्षे जुने असून त्यात सहा पंम्पिग यंत्रे आहेत ही यंत्रे जुनाट झाल्याने ती बदलण्याची शिफारस मलनि:सारण प्रचालन विभागाने केली होती, मात्र ही यंत्र निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार आल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी चौकशी करण्याचे आदेश देऊनच या खरेदीचा प्रस्ताव स्थायी समितीत आणला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा. मुख्यमंत्री यांनी लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील १४०० मि.मि. आकाराच्या नाईफ गेट व्हॉल्वच्या खरेदीतील गैरव्यवहाराविषयी चौकशी आदेश दिले नसून, लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या विविध संयंत्रांची निकड याविषयी चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

(२), (३) व (४) लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील ८ पंपिंग यंत्रांपैकी ३ पंपिंग यंत्रे बंद असल्यामुळे ती बदलण्याची शिफारस महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागाने केली होती.

सदर शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीस अनुसरुन विहित तांत्रिक विनिर्देशांसह (specifications) निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

परंतु, मा. मुख्यमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर, विविध संयंत्रांच्या निकडीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत दिनांक १९/०९/२०१६ रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली.

सदर समितीने लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील सर्व संयंत्रांच्या सद्य:स्थितीचा आढावा घेऊन केलेल्या शिफारशीनुसार, ८ पंपिंग यंत्रांपैकी ३ पंपिंग यंत्रे बदलण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडण्यात आला.

सदर यंत्रांच्या खरेदीची कार्यवाही सुरु असल्यामुळे सदर यंत्रे निकृष्ट दर्जाची असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## व्होळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींचे वायरिंग चोरी गेल्याची घटना

**(२२) * २७९२५ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्होळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिवा नदी काठावरील शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींचे वायरिंग चोरट्यांनी चोरुन नेल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी गुन्हा दाखल करण्यास करकंब पोलिसांनी टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मोटारींचे वायरिंग चोरणाऱ्या चोरांचा शोध घेणेबाबत व याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन करकंब पोलीस स्टेशन भाग ५ येथे गु.र.नं. १०/२०१७ भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे दि.१३/०१/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेले आहे.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपी अज्ञात असल्याने त्यांचा शोध घेण्याच्या अनुषंगाने सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच सदर गुन्हा दाखल करण्यास कोणताही प्रकारची टाळाटाळ केली नसल्याने व त्याच दिवशी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात न्यायालय स्थापन करणेबाबत

**(२३) * २६८४४ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात न्यायालय स्थापन करण्यास १७ वर्षांपासून शासनाची मंजूरी असूनही न्यायालय सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात न्यायालय नसल्याने तेथील नागरिकांना आपल्या विविध विभागातील खटले घेऊन जव्हार, वाडा किंवा भिवंडी येथील न्यायालयावर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त तालुक्यात न्यायालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

राज्यातील विविध ठिकाणी न्यायालय स्थापन करण्याबाबतची शिफारस मा. उच्च न्यायालयाकडून शासनास करण्यात येते. त्यानुसार नवीन न्यायालय स्थापनेबाबतची कार्यवाही शासनाकडून करण्यात येते.

विक्रमगड येथे न्यायालय स्थापनेबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) विक्रमगड तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील फौजदारी खटले व दिवाणी दावे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जव्हार येथे दाखल करण्यात येतात.

(३) उपरोक्त १ प्रमाणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत रुग्णांना निधी मंजूर करण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(२४) * २७५६१ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या अनेक रुग्णालयांमध्ये रुग्णांना उपचारासाठी धर्मदाय संस्थांकडून जमवलेला निधी राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये मंजूर करण्यासाठी भाभा रुग्णालयामध्ये असंख्य फेऱ्या मारावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब व गरजू रुग्णांसाठी सुरु करण्यात आलेली ही योजना उपनगरीय व नवीन बांधलेल्या रुग्णालयांमध्ये अजूनही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णांना धर्मदाय संस्थांकडून मदत मिळण्यासाठी रुग्णालयाकडून महागडे औषधे लिहून दिली जात असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर योजना मुंबईतील महापालिकेच्या सर्व रुग्णालयात राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या निकषानुसार, मुंबईतील खालील ९ उपनगरीय रुग्णालयांत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु आहे :-

- के. बी. भाभा रुग्णालय (वांद्रे)
- व्ही. एन. देसाई रुग्णालय (सांताक्रुझ)
- म. वा. देसाई रुग्णालय (मालाड)
- भगवती रुग्णालय (बोरीवली)
- के. बी. भाभा रुग्णालय (कुर्ला)
- पं. म. मो. मालवीय शताब्दी रुग्णालय (गोवंडी)
- राजावाडी रुग्णालय (घाटकोपर)
- स्वा. वि. दा. सावरकर रुग्णालय (मुलुंड)
- म. तु. अगरवाल रुग्णालय (मुलुंड)

तथापि, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा सर्वसाधारण रुग्णालय (कांदिवली), सिध्दार्थ रुग्णालय (गोरेगांव) व सन २०१३ मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या जोगेश्वरी (पूर्व) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर महानगरपालिका रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना अद्‌याप सुरु नाही ही वस्तुस्थिती आहे.
(३) हे खरे नाही.

उपनगरीय रुग्णालयांतील गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक असणारी व वैद्‌यकीय अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली औषधे महानगरपालिकेच्या औषध अनुसूचीमधून रुग्णालयांमार्फत पुरविली जातात.

अस्थिव्यंग शल्यक्रियेसाठी रुग्णांसाठी आवश्यक असणारे साहित्य (इम्प्लांटस) महानगरपालिकेच्या अनुसूचीवर उपलब्ध नसल्यामुळे सदर साहित्य रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंतर्गत अनुसूचीतील कंत्राटदारांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, त्यासाठी रुग्णांना कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

तसेच, महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना औषधोपचार मोफत दिला जातो.
(४) व (५) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा सर्वसाधारण रुग्णालय (कांदिवली), सिध्दार्थ रुग्णालय (गोरेगांव) तसेच, जोगेश्वरी (पूर्व) येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर महानगरपालिका रुग्णालयात येथे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**पुणे महापालिकेने मिळकतकराच्या थकबाकी वसूलीसाठी राबविलेल्या अभय योजनेच्या जाहिरातीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२५) * २६८१८ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेने मिळकतकराच्या थकबाकी वसूलीसाठी राबविलेल्या अभय योजनेच्या जाहिरातीसाठी भाडेतत्वावर घेतलेल्या केवळ १५ रिक्षांसाठी सुमारे रुपये ४८ लाख भाडे अदा केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार महिन्यांसाठी मोठया प्रमाणात भाडे दिल्याने यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मिळकत कर वसूली व भरणा करण्यासाठी नागरिकांना प्रबोधन व आवाहन करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत रीतसर ऑनलाईन जाहीर निविदा मागवून भाडेतत्वावर १५ रिक्षा उपलब्ध करून घेण्यात आल्या होत्या.

रिक्षा उपलब्ध करून घेणे तसेच वाहनचालक, इंधन, अपघात, बिघाड देखभाल, दुरूस्ती, ध्वनीक्षेपण यंत्रणा ई. खर्चासाठी एकूण रु. ४८,०६,०००/- या रक्कमेपैकी रूपये १९,८४,५००/- चे बिल अदा करण्यात आले असून रूपये २८,२१,५००/- अदा करावयाचे आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

**नाशिक शहर तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी**
**मंदिरात होत असलेल्या चोरीच्या घटना**

**(२६) * २७५५१ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर परिसरात तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान चोरट्यांनी विविध मंदिरांना लक्ष्य करून मंदिरातून साहित्य, दागिने व दान पेटीतील हजारोची रक्कम चोरून नेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक रोड, उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, देवळाली गांव येथे श्री म्हसोबा महाराज व सायखेडा रोडवरील दुर्गादेवीचे ऐतिहासिक मंदिर, नवश्या गणपती मंदिराचे आवारातुन पितळी घंटा व साहित्य तसेच मालेगांव येथील वर्धमान नगर भागातील संभवनाथ जैन मंदिराची दानपेटी फोडणे, त्याचप्रमाणे ओझर येथील मारुती मंदिरातील दान पेटी फोडणे, अशा विविध ठिकाणी चोरींच्या घटना घडल्याप्रकरणी पोलिसांनी तपास केला आहे काय,

(३) असल्यास, तपासात काय निष्पन्न झाले व चोरट्यांना अटक करून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे काय तसेच अशा घटनांना प्रतिबंध घालणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

सदर बाबत नाशिक जिल्ह्यात व शहरात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

(१) ओझर पोलीस ठाणे गु.र.नं. ७/२०१७ भा.दं.वि.कलम ४५७,३८०.
(२) नांदगांव पोलीस ठाणे गु.र.नं. ७/२०१७ भा.दं.वि.कलम ४५७,३८०.
(३) मालेगांव पोलीस ठाणे गु.र.नं. २८०/२०१६ भा.दं.वि.कलम ४५७,३८०.
(४) गंगापूर पोलीस ठाणे गु.र.नं. २५९/२०१६ भा.दं.वि.कलम ३७९.
(५) नाशिक रोड पोलीस ठाणे गु.र.नं. ६४६/२०१६ भा.दं.वि.कलम ४५४,४५७,३८०.
(६) उपनगर पोलीस ठाणे गु.र.नं. ०६/२०१७ भा.दं.वि.कलम ४५४,४५७,३८०.
(७) सरकारवाडा पोलीस ठाणे गु.र.नं. ३५/२०१७ भा.दं.वि.कलम ४५५,३८०,३४.
(८) आडगांव पोलीस ठाणे गु.र.नं. २०४/२०१६ भा.दं.वि.कलम ४५७,३८०.

(३) गु.र.नं. २५९/२०१६ या गुन्ह्यात २ आरोपींना अटक करुन ६,२००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गु.र.नं. ६४६/२०१६ या गुन्ह्यात २ आरोपींना अटक करुन १,५००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गु.र.नं. ०६/२०१७ या गुन्ह्यात १ आरोपींना अटक करुन १०,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गु.र.नं. २८०/२०१६ या गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करुन ९,१८०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत गुन्ह्यांचा तपास चालु आहे.

अशा प्रकारचे गुन्हे घडू नये याकरीता नाशिक शहरातील सर्व मंदिराच्या प्रशासकाना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत व सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. नाशिक शहरातील मंदिराच्या परिसरात मेटल डिटेक्टर बसविण्यात आले असून साध्या गणवेशातील पोलिसांची पायी पेट्रोलिंग वाढविण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील सफाई कामगारांना किमान वेतन देण्याबाबत**

**(२७) * २८४५१ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सफाई कामगारांना किमान वेतन देण्याचे शासनाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मान्य करुनही अद्‌याप मिळत नसल्याने सफाई कामगारांनी दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चा काढून धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राज्यातील सफाई कामगारांना किमान वेतन देण्याचे मान्य करुनही थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार राज्यातील सफाई कामगारांना मान्य केलेल्या दिनांकापासून किमान वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कामगार विभागाने दिनांक २४/२/२०१५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित उद्योगातील किमान वेतनाची अधिसूचना निर्गमित केली असून नगरविकास विभागाने दिनांक २२/१/२०१६ रोजी परिपत्रक काढून दिनांक २४/२/२०१५ रोजीच्या अधिसूचनेची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत महानगरपालिका /नगरपालिकांना निर्देशित केले आहे.

मुंबई, ठाणे, नाशिक महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व इतर कायदेशीर सुविधा मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या.

त्यानुषंगाने मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०८/२०१६ रोजी आयोजित बैठकीत महानगरपालिकेतील कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या सेवाभावी संस्था व कंत्राटदार यांना दिनांक २४/०२/२०१५ रोजीच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानुषंगाने बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक येथील महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांना नोव्हेंबर, २०१६ पासून सुधारित किमान वेतन दराप्रमाणे वेतन देणे सुरु केले आहे. तथापि, कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका यांनी अद्यापपर्यंत सुधारीत दराने किमान वेतन लागू केले नसून दोन्ही महानगरपालिकांवर त्यानुषंगाने खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच नाशिक महानगरपालिकेने त्यांच्याकडील ४८९ कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतनातील फरकापोटी रुपये ४,३२,६०,५४२/- वाटप केले आहे. ऊर्वरित महानगरपालिका/नगरपालिकांनी त्यांच्याकडील कंत्राटी सफाई कामगारांना सुधारित किमान वेतन दराप्रमाणे वेतन द्यावे यासाठी कामगार आयुक्त कार्यालयामार्फत पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला (जि.नाशिक) शहरातील भुयारी गटार योजनेसाठी निधी मंजुर करण्याबाबत**

**(२८) * २७१८३ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १४९५८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील भुयारी गटार योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान मधून निधी मंजुरीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक २६ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला केंद्र शासनाची मंजुरी मिळण्या अगोदरच नगरपरिषदेने काम सुरु केले असले तरी येवला शहरात भुयारी गटार योजनेसाठी निधी मंजूर केला नसल्यामुळे अद्यापपर्यंत निविदा काढण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तातडीने निधी मंजूर करुन भुयारी गटाराचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४)

- येवला नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्प केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला होता.
- तथापि सदर प्रकल्पास दिलेली मान्यता केंद्र शासनाने रद्द केल्याने युआयडीएसएसएमटी योजनेतून निधी उपलब्ध झाला नाही.
- केंद्र शासनाकडून निधी मिळण्यापूर्वीच नगरपरिषदेने सदर कामाची निविदा काढून काम सुरु केले.
- सदर प्रकल्प सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातून मंजुर करण्याचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने शासनास सादर केला आहे.
- मात्र हा प्रकल्प नव्याने मंजुर करताना पुन्हा निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असून अगोदरच सुरु केलेल्या कामासाठी शासनाकडुन निधी अनुज्ञेय राहणार नाही.

-----------------

**टिटवाळा (पुर्व), (जि.ठाणे) येथे चाम्स ग्रुप या विकासकावर कारवाई करणेबाबत**

**(२९) * २९०५०  श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळा (पुर्व), (जि.ठाणे) येथे चाम्स ग्रुप या विकासकाने चाम्स पॅराडाईज या नावाने काही इमारती बांधल्या असून या इमारतीच्या जागेत पूर्वी मोठे असलेले शिव मंदीर तोडण्यात येवून त्याठिकाणी एक छोटे मंदिर बांधून मंदिराच्या वाढीव चटई क्षेत्राचा अवैध वापर केला तसेच येथील 'बी' इमारतीमधून एक वर्षाच्या कालावधीतच गळती सुरु झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदरहू विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार सदर इमारतीचे नकाशे मंजूर करण्यापूर्वी तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडील सर्वेक्षण नकाशात त्या ठिकाणी मंदिर असल्याची कोणतीही नोंद नाही.

या संकुलातील 'बी' इमारतीमधून गळती होत असल्याबाबतची कोणतीही तक्रार माहे जानेवारी, २०१७ वा त्यासुमारास महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे,

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हा महापालिकेतील शहरांच्या पिण्याच्या पाण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(३०) * २६७६१ श्री.संजय दत्त, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ-बदलापूर या शहरांची पाण्याची गरज १३०७ दशलक्ष लीटर आहे. मात्र, सध्या भातसा, तानसा, वैतरणा, बारवी, चिखलोली आणि शहाड टेमघरमधून १२१२ लीटर पाणी मिळत असल्याने तसेच वाढते शहरीकरण आणि नव्याने विकसित होणाऱ्या उत्तुंग वसाहतींमुळे या परिसरात पिण्याचा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील लोकसंख्या व टोलेजंग इमारतीमध्ये सतत वाढ होत असल्याने तेथील नागरिकांना पाणी पुरवठयाचे नियोजन महानगर पालिकेला करता येत नसल्याने पाणी पुरवठयाच्या धोरणाबाबत ३ आठवडयात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश मा.न्यायालयाने महानगरपालिकेला माहे जानेवारी, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ठाणे शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत व पाण्याचे योग्य नियोजन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर या शहरांची सध्याची पाण्याची गरज ११८१ द.ल.लि. इतकी आहे.

सदर शहरांना उल्हास नदी, चिखलोली धरण, भोज धरण, स्टेम प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ व अन्य योजनांतून ११७६ द.ल.लि. पाणी पुरवठा उपलब्ध करण्यात येत आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे व नव्याने विकसित होणाऱ्या वसाहतीमुळे पाण्याची गरज वाढत आहे, हे खरे आहे.
(२) जनहित याचिका क्र.३६/२०१६ च्या अनुषंगाने ठाणे शहरातील पाण्याची समस्या व याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करणेबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी ठाणे महानगरपालिकेस आदेश दिलेले आहेत.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ठाणे महानगरपालिकेकडून सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांचा लिलाव करण्याबाबत

**(३१) * २६७९५ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ४० लाख झोपडपट्टीवासियांना घरे मिळावी याकरीता स्थापन झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील प्रगती नसलेल्या ११४ झोपु योजनांचा लिलाव करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे तसेच पुनर्विकास प्रकल्प रखडविणा-या विकासकांना झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने नोटीस पाठविण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी काही योजना २५ वर्षांपासून रखडल्याचे निदर्शनास आले असून पुनर्विकास प्रकल्प रखडल्याने लोकांना १५-२० वर्षे संक्रमण शिबिरात रहावे लागत असल्याने अशा दोषी विकासकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा लिलाव करण्याची तरतुद नाही. तथापि, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्रगती नसलेल्या व प्रकल्प रखडविणाऱ्या एकूण १२४ विकासकांना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ चे कलम १३(२) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) उपरोक्त नमूद केल्यानुसार नोटीसा देण्यात आलेल्या एकूण १२४ विकासकांपैकी २ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने या २ विकासकांना पाठविलेल्या नोटीसा प्राधिकरणाकडून मागे घेण्यात आल्या आहेत. उर्वरित १२२ विकासकांकडून त्याबाबतचा लेखी खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे झो.पु. प्राधिकरण स्तरावर प्रस्तावित आहे.

-----------------

## मुंबईतील मान्यता प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळांची अनधिकृत बांधकामे व ताब्यात असलेल्या जागा नियमित करण्याबाबत

**(३२) * २८५११ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मान्यताप्राप्त अधिकृत प्राथमिक व माध्यमिक शाळांची अनधिकृत बांधकामे आणि या शाळांच्या वापरात व ताब्यात असलेल्या जागा नियमित करण्याची आवश्यकता असल्याने अशा सर्व जागांना नव्या विकास आराखडयात (डीपी) शैक्षणिक आरक्षण मिळावे अशी विविध शिक्षण संस्थांनी आणि लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व शिक्षण संस्थांच्या ताब्यातील व वापरातील जागांवर शैक्षणिक आरक्षण जाहिर करुन त्यांना चार एफएसआय (पैकी दोन एफएसआय विक्री योग्य) देण्याचा शासनाचा विचार आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचे शासनाचे धोरण काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी विधीमंडळामध्ये तारांकित प्रश्न तसेच लक्षवेधी सूचनेद्वारे तशी मागणी केलेली आहे.

(२) ते (४) बृहन्मुंबई क्षेत्राची सुधारित प्रारुप विकास योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रसिध्द झालेली असून वैधानिक कार्यवाही पूर्ण होवून शासनास मंजूरीसाठी सादर होणार आहे. सबब मंजूर विकास योजनेमध्ये सदर शाळांच्या बांधकामाच्या अनुषंगाने काही अडचणी असतील तर त्या सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये दुरुस्त (सीआरझेड क्षेत्र वगळता) करणेच्या अनुषंगाने शासन प्रयत्नशील आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार शैक्षणिक प्रयोजनार्थ असलेल्या स्वतंत्र भूखंडामध्ये शैक्षणिक कारणासाठी ३०० टक्के इतका अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध आहे. झोपडपट्टी पुनवर्सन योजनेंतर्गत शाळा व त्यालगतचा भूखंड हा पुनवर्सन योजनेपासून स्वतंत्र दर्शविता येत नसल्याने विद्यमान शाळेचे क्षेत्र व विकास नियंत्रण नियमावलीनुसार किमान आवश्यक क्षेत्र यामधील कमाल क्षेत्र पुनर्विकासासाठी अनुज्ञेय रहाणार आहे.

-----------------

## सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) पहाडावर नक्षलवाद्यांनी वाहनांची केलेली जाळपोळ

**(३३) * २८७९५ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) पहाडावर ४० वाहनांची नक्षलवाद्यांनी जाळपोळ केल्याची घटना दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरजागड पहाडीपासून केवळ तीन ते चार किलोमीटर अंतरावर पोलीस ठाणे व सी.आर.पी.एफ.च्या चार चौकी तैनात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची माहिती येथील पोलीस ठाणे व सी.आर.पी.एफ.च्या चार चौकींना उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील पोलीस यंत्रणा आधुनिक शस्त्र तसेच माहिती यंत्रणेनी सुसज्ज करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) घटनास्थळ तालुका व पोलीस ठाण्यापासून २० किलोमीटर पूर्वेस असून घटनास्थळापासून ५ किलोमीटर पश्चिमेस सशस्त्र पोलीस दूरक्षेत्र हेडरी आहे. तर २२ किलोमीटर दक्षिण पूर्वेस गट्टा (जां.) सशस्त्र पोलीस दूरक्षेत्र आहे. घटनास्थळाच्या उत्तर पूर्वेस राज्याच्या सीमेलगत क्षेत्रात ५० ते ६० किलोमीटर परिसरात पोलीस ठाणे किंवा सशस्त्र दूरक्षेत्र नाहीत. सदर दोन्ही ठिकाणी पोलीस दलाच्या मदतीकरीता राज्य राखीव पोलीस बलाचे प्लॉटुन व सी.आर.पी.एफ. चे कंपन्या तैनात आहेत.

(३) सुरजागड परिसरात दिनांक १७/१२/२०१६ व २०/१२/२०१६ रोजी नक्षलसमर्थक व नक्षलप्रणीत संघटना सुरजागड लोहखान प्रकल्पाविरोधात गावक-यांशी बैठक घेणार असल्याची गुप्त वार्ता प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने दिनांक २१/१२/२०१६ रोजी सुरजागड परिसरात नक्षलविरोधी अभियान राबविण्यात आले होते.

दिनांक २३/१२/२०१६ रोजी मौजे मंगेर गावातील श्री.चंद्र कवडो यांना नक्षलवाद्यांच्या ताब्यात देण्यासाठी नक्षलसमर्थकांनी अज्ञात ठिकाणी डांबून ठेवल्याची गुप्त वार्ता मिळाली होती. सदर माहितीवरुन पोलीस दूरक्षेत्र हेडरे येथील पोलीस पथक मंगेर जंगल परिसरात नक्षल शोध मोहिम राबवून पोलीस दूरक्षेत्रात परतल्यानंतर नक्षलवाद्यांकडून सदर उल्लेखित घटना घडवून आणल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) (१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

(२) जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते.

(३) जिल्हयात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युद्धप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी येथे सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३४) * २८२४९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेने विविध ठिकाणी काही वर्षापूर्वी सव्वाबारा कोटी रुपये खर्चून उभारलेल्या पाण्याच्या १६ टाक्या आजपर्यंत कोरडयाच असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे भिवंडीकरांची दिशाभूल करणाऱ्या महापालिकेचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याबद्दल नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागरिकांना मुबलक व सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना या प्रकरणी सखोल चौकशी करून चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) नागरिकांना पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी अमृत योजनेतून रुपये २०५.५२ कोटींचा पाणी पुरवठा प्रकल्प मंजुर केला आहे. या योजनेत यापूर्वी उभारलेल्या पाण्याच्या १६ टाक्या उपयोगात आणण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील उपवन तलावाच्या परिसरातील लॉजमध्ये अनधिकृत व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(३५) * २७२०७ श्री.शरद रणपिसे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील उपवन तलावाच्या चौपाटीलगत असलेल्या सत्यम लॉजच्या मालकाने जमिनीखाली तीन मजली तळघर तयार करून त्यात २९० खोल्यांचे बांधकाम करुन अनधिकृत व्यवसाय सुरु केल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात अनेक अनधिकृत लॉज सुरु असल्याचे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी मोहिमे दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून या गैरप्रकारास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) या परिसरातील सत्यम लॉजसह व इतर ८ बार तसेच अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) या प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच या प्रकरणी वर्तक नगर पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील फॉरेस्ट नाका परिसरातील डंम्पिंग ग्राऊंडला लागलेलीआग

**(३६) * २९२३० श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील फॉरेस्ट नाका परिसरातील डंम्पिंग ग्राऊंडला दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागून धुमसत राहिल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी वारंवार लागणाऱ्या आगीमुळे नागरिकांना श्वसनाचे विकार, डोळे चुरचुरणे, घशात खवखवणे असे त्रास होत असून याबाबत तक्रार करुनही संबंधित विभागाचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंबरनाथ येथील फॉरेस्ट नाका परिसरातील सुमारे ३७,००० चौ.मी. क्षेत्रावरील डंम्पिंग ग्राऊंडमध्ये विविध ठिकाणी विखुरलेल्या साधारणत: ४० चौ.मी. भागामध्ये दिनांक ०२/०१/२०१७ रोजी कचऱ्याच्या ढिगाऱ्यास आग लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे.

तथापि, एक तासाच्या कालावधीमध्ये सदरहू आग पुर्णत: विझविण्यात आली. या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात धुराचा त्रास झाला असला तरी त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला अशी बाब उद्‌भवली नाही.

(३) व (४) कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषदेमार्फत त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या मौजे चिखलौली येथील जागेवर नव्याने क्षेपणभूमी विकसीत करण्यात येत आहे.

-----------------

**नागपूर शहरातील धर्मादाय रुग्णालयाकडून रुग्णांवर**
**योग्य उपचार होत नसल्याबाबत**

**(३७) * २८७१२ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंद असलेल्या रुग्णालयात सवलतीच्या दरात उपचार करण्याची सुविधा असताना रुग्णांवर योग्य उपचार न करता गरजेपेक्षा अधिक कागदपत्राची मागणी करुन त्यांना उपचारापासून वंचित ठेवत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा रुग्णालयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या रुग्णालयांचे शासन ऑडीट करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना**
**शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(३८) * २६७८९ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे यासंदर्भात औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन, २०१६ दरम्यान मा.कौशल्य विकास मंत्री यांचे समवेत झालेल्या बैठकीत त्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजीपर्यंत पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांची समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्वासनाची पूर्तता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) पदवीधर अंशकालीन कर्मचा-यांना कंत्राटी तत्वावर शासन सेवेत सामावून घ्यावे किंवा कसे याबाबत प्रशासकीय, वित्तीय व विधी विषयक बाबी सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोंढवा बुद्रुक (जि.पुणे) परिसरातील बेक्स अँड केक्स बेकरीला लागलेल्या आगीत सहा कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३९) * २६७२६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा बुद्रुक (जि.पुणे) परिसरातील बेक्स अँड केक्स या बेकरीमध्ये दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीत बेकरीमध्ये झोपलेल्या सहा कामगारांचा गुदमरुन मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत कामगार परप्रांतिय असल्याने ते पळून जावू नये यासाठी त्यांना बंदिस्त ठेवल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील बेकरी उत्पादन घेणा-या व्यावसायिकांनी नियमांना डावलून दुकाने उभारली असून या ठिकाणी काम करणाऱ्या बहुतेक कामगारांची कामगार आयुक्तांच्या कार्यालयात नोंद नसल्याचे तसेच या व्यवसायात सुमारे ३० ते ४० टक्के कामगार हे वेठबिगारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बेकरी चालक व मालक यांचेवर कोणती कारवाई केली तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही. सदरचे बेकरी कामगार हे बेकरी मालकासह सदर बेकरीमध्ये रात्री उशीरापर्यंत काम करीत होते व रात्री ते कामगार बेकरीतच झोपत होते. सदर कामगार सकाळी लवकर उठत नसल्याने बेकरीमालक हे सकाळी लवकर येऊन बेकरी उघडत असल्याने स्वत: बेकरी उघडण्याकरीता ते बेकरीस रात्री उशीरा जातांना बेकरीस बाहेरुन कुलूप लावून जात होते व दुसरे दिवशी सकाळी लवकर येऊन बेकरी उघडत होते. त्यामुळे कामगार हे पळून जाऊ नये याकरीता आरोपी/बेकरीचे मालक बाहेरुन कुलूप लावून जात होते असे गुन्हयाच्या तपासात निदर्शनास आलेले नाही.
(३) पिंपरी चिंचवड शहरामध्ये २,३०,१३४ इतक्या दुकाने व आस्थापनांची नोंद असून महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ च्या कलम ७ (१) नुसार आस्थापनेने आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर व नोंदणी शुल्काचा भरणा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी प्रमाणपत्र निर्गमीत केले जाते. बेकरीकरीता स्वतंत्रपणे दुकान/आस्थापनांची नोंदणी केली जात नाही. नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कामगार संख्या नमूद असते परंतु कामगारांच्या यादीची अभिलेखात नोंद नसते. त्यामुळे या व्यवसायातील सुमारे ३० ते ४० टक्के कामगार वेठबिगारी करीत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(४) या दुर्घटनेबाबत कोंढवा पो.स्टे. येथे गु.र.क्र. ५४४/२०१६, भा.दं.वि. कलम ३०४, ३४१, ३४२, ३४ व मुंबई महापालिका अधिनियम कलम ४७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हयाच्या तपासात तीन आरोपींना ( बेक्स अँड केक्स बेकरी चे मालक/भागीदार) दिनांक ३०/१२/२०१६ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत तर गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

क्षेत्रीय दुकाने निरीक्षक यांचेमार्फत संबंधीत आस्थापनेवर खटले दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच मा. कामगार न्यायालय तथा नुकसानभरपाई आयुक्त यांना मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मिळणेबाबत कामगार आयुक्तांच्या कार्यालयामार्फत कळविण्यात आलेले आहे.

सदर बेकरीने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ चे कलम ३१ अन्वये आवश्यक अन्न परवाना न घेता व्यवसाय करीत आढळल्याने बेकरीच्या भागीदारांविरुध्द खटला दाखल करण्याबाबतची कार्यवाही आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचे स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंजाळ (ता.वाडा, जि.पालघर) प्रकल्पाचे काम सुरू करणेबाबत**

**(४०) * २७०८० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने राखून ठेवलेल्या पिंजाळ प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही सदर प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार देहरजी सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करून सिंचनाची व पिण्याचे पाण्याची टंचाई दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पिंजाळ प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे विकसित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४/०२/२०१३ रोजी जलसंपदा विभागामार्फत घेण्यात आला.

केंद्रीय जल आयोग, पर्यावरण व वन मंत्रालय तसेच, राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांच्याकडून परवानगी प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेले सुसाध्यता अहवाल, पर्यावरणीय परिणाम निर्धारण अहवाल व जैवविविधता अहवाल पूर्ण करण्यात आले आहेत.

तसेच, सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल व प्रकल्प क्षेत्राचे सीमांकन सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करुन घेण्यात येणार असून, आवश्यक असलेल्या विविध परवानग्या मिळविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येणार आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पास परवानगी प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

तसेच, देहरजी सिंचन प्रकल्पास जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांचेकडून दिनांक १८/०३/२०१६ रोजी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, भूसंपादन व संकल्पचित्र तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

**उल्हासनगर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची (आय.टी.आय.) झालेली दुरवस्था**

**(४१) * २७०१० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची (आय.टी.आय.) दुरवस्था झाली असून तेथील विद्यार्थ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये शिकविले जाते, बाकडे नसल्यामुळे जमिनीवर बसुन शिक्षण घ्यावे लागते, तसेच तेथे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे, शौचालयांची दुरवस्था असणे, संपुर्ण संस्थेसाठी एकच सफाई कर्मचारी असणे, शिक्षकांची संख्या कमी असणे, ठिकठिकाणी संरक्षण भिंत पडल्यामुळे आवारात प्राणी सुध्दा आढळतात, अशा असंख्य अडचणीचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१), (२) व (३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उल्हासनगर येथे फक्त इलेक्ट्रॉनिक्स हा व्यवसाय यापुर्वी पत्र्याच्या शेडमध्ये कार्यरत होता. विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी या संपुर्ण व्यवसायासाठी शासकीय तांत्रिक विद्यालय, उल्हासनगरच्या नवीन इमारतीतील पहिल्या मजल्यावरील दोन वर्गखोल्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तेथे इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायाचे प्रशिक्षण सुरळीत सुरु आहे.

- विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाकडी उपलब्ध आहेत.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कल्याण व उल्हासनगर या दोन्ही संस्थांसाठी संयुक्तरित्या पाण्याचा वापर केला जातो. या करिता उल्हासनगर महापालीकेमार्फत स्वतंत्र जोडण्या घेण्यात आल्या आहेत. तसेच या दोन्ही संस्थांसाठी कुलरचे स्वच्छ पाणी उपलब्ध आहे.
- तसेच दोन्ही संस्थांसाठी स्वच्छतागृहाच्या सफाईसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त केले आहेत. त्यांच्यामार्फत सफाईचे काम नियमित करण्यात येते.

- रिक्त असलेली शिल्प-निदेशकांची पदे तासिका तत्वावर भरण्यात आली आहेत. तिन्ही पाळ्यांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण सुरळीत सुरु आहे.
- शासकीय तांत्रिक विद्यालय, उल्हासनगर परिसरात ज्या ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उल्हासनगर या संस्थेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरु आहे, त्यामागील बाजुस अंदाजे ५० फुट लांबीची संरक्षण भिंत, तेथे असलेल्या नाल्यामुळे पडलेली आहे. सदर भिंतीच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील ५६ वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(४२) * २७९३१ ॲड.अनिल परब, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये असलेल्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास करण्याच्या मागणीसाठी म्हाडा कार्यालयासमोर दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजीपासून रहिवाश्यांनी उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात मुंबईतील लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मा.गृहनिर्माण मंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन कार्यवाही केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त कार्यवाहीचे स्वरूप काय व मागणीबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.

(२) या अनुषंगाने खेरनगर म्हाडा पुनर्विकास समन्वय समिती (नि.) यांचे दिनांक ०१/०१/२०१७ रोजीचे निवेदन मंत्री, गृहनिर्माण यांना प्राप्त झाले आहे.

(३) व (४) म्हाडाच्या मुंबईतील वसाहतींचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (५) मधील तरतुदीनूसार करण्यात येतो. शासनाच्या नगर विकास विभागाने सदर विनियम ३३(५) मधील तरतुदीमध्ये फेरबदलाची सूचना दिनांक ०५/०१/२०१७ रोजी प्रसिध्द करुन जनतेकडून हरकती/सुचना मागविलेल्या असुन, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) येथील मिंडा साई कंपनी व्यवस्थापनाने कामगारांना सेवेतून कमी केल्याबाबत

**(४३) * २८१३६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील धानिवली औद्योगिक क्षेत्रातील मिंडा साई कंपनीच्या व्यवस्थापनाने काही कामगारांना अचानक सेवेतून कमी केल्यामुळे सदरहू कामगारांच्या संघटनेने दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने किती कामगारांना व कोणत्या कारणास्तव अचानक सेवेतून बडतर्फ केले आहे,

(३) असल्यास, कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाकडे अनेक वर्षापासून केलेल्या प्रलंबित मागण्यांचे स्वरूप काय आहे व त्यापैकी किती मागण्या व्यवस्थापनाने बैठकीत मान्य करूनही त्याची अंमलबजावणी केलेली नाही,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बडतर्फ कामगारांना त्वरित सेवेत सामावून घेऊन कामगारांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे .

मे.मिंडा साई लि., धानिवली, ता.मुरबाड, जि. ठाणे. या व्यवस्थापनाने दिनांक १६/०८/२०१६ रोजी ३१ कंत्राटी कामगारांना त्यांचे पुरवठादार/व्हेंडर (मे.श्री साई एंटरप्रायजेस) यांच्याकडे काम करण्यासाठी पाठविलेले होते. त्यास कामगारांनी विरोध केला होता. त्या अनुषंगाने सदर कामगारांनी पुर्वीच्या ठिकाणीच काम मिळावे, याकरीता दिनांक २८/१२/२०१६ रोजी कंपनीच्या गेटवर आंदोलन केले होते, हे खरे आहे. दिनांक १३/१/२०१७ रोजी व्यवस्थापन प्रतिनिधी व संघटनेचे अध्यक्ष यांची परस्पर बैठक होवून तडजोड झालेली आहे.

(२) या व्यवस्थापनाने दिनांक १६/०८/२०१६ रोजी ३१ कंत्राटी कामगारांना त्यांचे पुरवठादार/व्हेंडर (मे.श्री साई एंटरप्रायजेस) यांच्याकडे काम करण्यासाठी पाठविलेले होते. कारण मे.मिंडा साई लि., धानिवली, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील ३१ कंत्राटी कामगारांची कार्यक्षमता कमी असणे,शिस्तीचे पालन न करणे व मार्केटमध्ये मंदी असल्यामुळे दिनांक १६/८/२०१६ पासून उत्पादन प्रक्रिया बंद

करुन श्री.साई एंटरप्रायजेस, रायते, ता.कल्याण, जि.ठाणे येथील त्यांच्या पुरवठादार/व्हेंडर यांच्याकडे सदर ३१ कंत्राटी कामगारांना कामासाठी जाण्याबाबत दोन कंत्राटदारांमार्फत दिनांक १६/८/२०१६ रोजी प्रवेशद्‌वारावर नोटीस प्रदर्शित केलेली होती.

(३) कामगारांच्या प्रलंबित मागण्याबाबत या कार्यालयात यापुर्वी तक्रार दाखल झालेली नव्हती. तथापि, दिनांक १६/०८/२०१६ रोजी ३१ कंत्राटी कामगारांना त्यांच्या मुख्य नियोक्त्याने त्यांच्या पुरवठादार /व्हेंडर(मे.साई एंटरप्रायजेस) यांच्याकडे काम करण्यासाठी पाठविलेले होते. तथापि त्यांना पुर्वीच्या ठिकाणी काम मिळावे यासाठी दिनांक २३/०८/२०१६ रोजी कंत्राटी कामगार संघटनेने या कार्यालयाकडे तक्रार दाखल केलेली होती. त्या अनुषंगाने दिनांक १३/०१/२०१७ रोजी कंत्राटी कामगार संघटना व व्यवस्थापन यांच्यामध्ये परस्पर चर्चा होऊन तडजोड झालेली असून, त्यानुसार कंत्राटी कामगारांना जे-४, अतिरिक्त एमआयडीसी, कुडवली, ता.मुरबाड, जि.ठाणे या ठिकाणी भाडेतत्वावर घेतलेल्या जागेमध्ये काम उपलब्ध करुन देण्याचे ठरले व दिनांक १/२/२०१७ रोजी पासून पुर्ववत काम चालू केलेले आहे.

(४) संघटनेने त्यांच्या दिनांक २३/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये ३१ कंत्राटी कामगारांना कंपनीने बेकायदेशिर कमी केल्याची तक्रार दाखल केलेली होती. त्या अनुषंगाने उभयपक्षांच्या दिनांक १६/०९/२०१६, ३०/०९/२०१६, ०४/१०/२०१६, १८/१०/२०१६, १०/११/२०१६, ०३/१२/२०१६, २३/१२/२०१६, व ०४/२/२०१७ रोजी बैठका घेतल्या. उभयपक्षांमध्ये दिनांक १३/०१/२०१७ रोजी परस्पर तडजोड होऊन कामगारांनी दिनांक ०१/०२/२०१७ पासून काम चालू केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पोलिसांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत**

**(४४) * २६८५७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.कपिल पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हेमंत टकले, श्री.शरद रणपिसे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.तानाजी सावंत, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस पत्नी संघाच्या अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली पोलीस कुटुंबांतील महिला आठ तासांची डयुटी, ओव्हर टाईम, अतिकामाचा ताण, त्यामुळे निर्माण होणारे आजार, सहाव्या वेतनाची थकबाकी, हक्काची घरे, चांगले वेतन इत्यादी मागण्यांसाठी आझाद मैदान, मुंबई येथे मागील ४० दिवसांपासून उपोषण सुरु असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.गृह राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर उपोषणावेळी मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण) यांना दिलेले निवेदनात नमुद विविध मागण्यांबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले असून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई येथे शिवसेना प्रमुखांचे स्मारक बांधण्याबाबत**

**(४५) * २७४८२ श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे शिवसेना प्रमुखांचे स्मारक बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन बाबीवरील शासनाचा निर्णय पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर स्मारकाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) शक्ती प्रदान समितीने शिवाजी पार्क येथील महापौर बंगला येथे दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक करण्याची शिफारस केली. सदर शिफारस शासनाने स्विकारली असून, त्यानुषंगाने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक ०३/०१/२०१७ रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला आहे.

सदर अध्यादेशाचे रुपांतर अधिनियमात करण्यासाठी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधेयक सादर करण्यात येणार आहे.

शिवाजी पार्क येथील महापौर बंगल्याचा भूखंड बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक या संस्थेस भाडेपट्टयाने देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७/०२/२०१७ रोजी ठराव केला आहे.

----------------

## नवी मुंबई शहराच्या विकासासाठी शासनाने १९७० मध्ये संपादित केलेल्या जमिनी विकासा अभावी पडून असल्याबाबत

**(४६) * २८११२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन १९७० मध्ये नवी मुंबई शहराच्या उभारणीसाठी सिडकोची स्थापना करून ठाणे तसेच रायगड जिल्हयातील पनवेल व उरण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल व उरण तालुक्यातील करंजाडे, न्हावे, वहाळ, फुंडे व गव्हाण या परिसरातील जमिनींचा समावेश शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील सुमारे ३ हजार २०० एकर जमिनीवरील रिजनल पार्क झोन मध्ये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनी रिजनल पार्क क्षेत्रात येत असल्यामुळे सुमारे ३ हजार २०० एकर जमीन सिडकोकडून अद्याप संपादित न झाल्याने या जमिनी विकासा अभावी पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे २ हजार शेतकऱ्यांचा मागील ४५ वर्षांपासून सिडको व शेतकऱ्यांचा शासनाकडे यासंदर्भात पाठपुरावा सुरू असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य शासनाने सन १९७० मध्ये सिडकोस नवी मुंबई नवे शहर अधिसुचित क्षेत्राकरीता नवीन शहर विकास प्राधिकरण म्हणून घोषित करुन नवी मुंबई नवे शहर प्रकल्पाकरीता ठाणे व रायगड जिल्हयातील, ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील ९५ गावातील क्षेत्र अधिसुचित करण्यात आले. सदर अधिसुचित क्षेत्रातील सर्व जमिनी सार्वजनिक वापराकरीता आवश्यक असल्यामुळे या सर्व जमिनी शासनाने नवीन शहरांसाठी संपादित करुन नवीन शहर विकास प्राधिकरणाला सार्वजनिक वापराकरीता हस्तांतरीत करणे अभिप्रेत आहे व त्याप्रमाणे शासनाकडून भूसंपादनाची कार्यवाही झाली आहे व होत आहे.
(२) पनवेल व उरण तालुक्यातील करंजाडे, न्हावे, वहाळ, फुंडे व गव्हाण या गावातील जमिनींचा समावेश नवी मुंबई प्रकल्पात आहे. परंतू विकास आराखडा तयार करताना ३० मीटर पातळीपेक्षा उंच डोंगर उतार मुख्यत्वेकरुन प्रादेशिक उपवन या क्षेत्रात दर्शविले आहे. त्यामुळे प्रादेशिक उद्यान क्षेत्र दर्शविताना ते कोणत्या गावाचा भाग आहे हे न पहाता तेथील जमिनीचा डोंगर उतार व ३० मीटर उंचीवरील पातळी हे निकष लावले आहेत. त्यामुळे असे दिसून येत की, करंजाडे, वहाळ, फुंडे व गव्हाण या गावामधील विकसनशील क्षेत्र रिजनल पार्क झोनमध्ये अंतर्भूत केलेले नाही. परंतु ज्या जमिनी ३० मीटर पातळीपेक्षा जास्त उंचीवर आहे त्यांचा समावेश रिजनल पार्क झोनमध्ये करण्यात आलेला आहे.
(३) विकास करताना प्रथम विकसनशिल क्षेत्रात येणा-या जमिनींचे भूसंपादन करण्याचा प्रस्ताव करण्यात आला व त्याप्रमाणे त्या जमिनींचे भूसंपादन करुन विविध नगरांचा (नोडस्) विकास करण्यात आला. प्रादेशिक उपवन क्षेत्र विकसनशिल नसल्याने कोणत्याच नगरांचा (नोडस्) भाग नव्हता. त्यामुळे प्रादेशिक उपवन क्षेत्रात येणा-या जमिनींचे भूसंपादन तत्परतेने करण्यात आले नाही. प्रादेशिक उपवन क्षेत्रातील जमिनी विकसनशिल नसल्याने त्यांचा विकास करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सिडकोने संपादित न केलेल्या जमिनींचे भूसंपादन व विकाससंबंधी तंत्र निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास दिनांक १९/१२/२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यावर संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव (दादर), मुंबई येथील सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या जागेवर विकासकाने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४७) * २९०९८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (दादर), मुंबई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि माधवदास पास्ता मार्गावरील शारदा मॅनशनच्या मागे असलेल्या सीटी सर्व्हे क्र२०/७६ या भूखंडातील ७७३.०० चौ.मी. जागा कलम १२६ अन्वये सार्वजनिक वापरासाठी/ शौचालयासाठी राखीव ठेवण्यात आली असतानाही ही जागा एका विकासकाने हडप करुन त्या जागेवर महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता ३ मजली अनधिकृत इमारत उभी केली असून या इमारतीला लागूनच आणखी एका इमारतीचे बांधकामही या विकासकाने सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागा हडप केल्याचे निवेदन, पुरावे व अनधिकृत बांधकामाबाबत तेथील नागरिकांनी सहाय्यक आयुक्त, एफ दक्षिण विभाग यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या आठवडयात दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दादर, नायगाव (मुंबई) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि माधवदास पास्ता मार्गावरील शारदा मॅन्शनच्या मागे असलेल्या सी. एस. क्र. २०/७६ हा भूखंड खाजगी मालकीचा असून, या जागेवर सार्वजनिक स्वच्छतागृहे व रोड डेपोचे आरक्षण असून ते निवासी पट्टयामध्ये आहे. सदर जागेचा ताबा सध्या मालकाकडे असून सदर ठिकाणच्या विकासाचा प्रस्ताव सादर झालेला नाही.

सदर ठिकाणी ३ मजली अनधिकृत इमारत उभी नाही. तथापि, सन १९६१ पूर्वीची ३ टॉलरेटेड (Tolerated) बांधकामे आहेत, त्यापैकी १ बांधकाम ३ मजली आहे. त्याशिवाय, सदर ठिकाणी ५ अनधिकृत बांधकामे आहेत.

तसेच अस्तित्वात असलेल्या ३ टॉलरेटेड (Tolerated) बांधकामांपैकी एका बांधकामावर पहिल्या मजल्याचे वाढीव अनधिकृत बांधकाम सुरु करण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी असलेल्या ५ अनधिकृत बांधकामांपैकी ३ अनधिकृत बांधकामांसंदर्भात महानगरपालिकेमार्फत सन २००८ व सन २०१० मध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनासाठी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

तथापि, सदर नोटीसींविरुध्द मा. नगर दिवाणी व सत्र न्यायालयाने "जैसे थे" आदेश पारित केलेले आहेत.

तसेच, अनिवार्य मोकळया जागेत बांधलेल्या व अस्तित्वात असलेल्या पहिल्या मजल्याच्या गच्चीवर बांधलेल्या तात्पुरत्या शेड प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने "जैसे थे" आदेश पारित केले आहेत.

सदर ठिकाणी भूखंड मालकाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये अस्तित्वात असलेल्या तळमजल्यावर सुरु केलेले पहिल्या मजल्याचे वाढीव अनधिकृत बांधकाम दिनांक १६/०८/२०१६ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**वाळकेश्वर येथील जय किसान या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासात विकासकाने बनावट कागदपत्राच्या आधारे फसवणूक केल्याबाबत**

**(४८) * २६७२४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळकेश्वर येथील जय किसान (इमारत क्र.२१०) या उपकर प्राप्त इमारतीत बनावट कागदपत्राच्या आधारे जास्तीचे भाडेकरु राहत असल्याचे भासवून त्याआधारे पुनर्विकासासाठी म्हाडाकडून दोन चटईक्षेत्र निर्देशांकाची परवानगी मिळवण्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर व याप्रकरणी सहभागी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) भूकर पाहणी क्र.११४ (भाग), मलबार हिल विभाग, येथील २२०, "जयकिसन निवास", वाळकेश्वर रोड या मालमत्तेच्या पुनर्विकासामध्ये मूळ ९ भाडेकरु/रहिवाशी असतांना विकासकाने सादर केलेली ४८ भाडेकरु /रहिवाशी यांची यादी तत्कालिन उपअभियंता, डी १ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्रमाणित केल्याची बाब डिसेंबर, २००७ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या निदर्शनास आली आहे.
(२) सदर प्रकरणी भाडेकरु पात्रतेसंदर्भात म्हाडाच्या स्तरावर चौकशी केल्यानंतर ४८ भाडेकरु/रहिवाश्यांऐवजी ९ भाडेकरु/रहिवाशी यांना ग्राहय धरुन शासनाच्या निदेशांच्या अनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त क्षेत्रफळाची गणना करुन विकासकाकडून रु. १८.६९ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी भाडेकरु/रहिवाश्यांच्या पात्रता निश्चिती प्रमाणित करणाऱ्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या तत्कालीन उपअभियंता यांच्यावर दोषारोपपत्र बजावण्यात आले असून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम,१९७९ मधील तरतुदीनुसार त्यांची १ वेतनवाढ कायमस्वरुपी सेवा संपेपर्यंत रोखून ठेवण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोरेगांव (मुंबई) येथील महापालिकेच्या सिध्दार्थ रुग्णालय परिसरात अस्वच्छता पसरल्याबाबत**

**(४९) * २६७५८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगांव (मुंबई) येथील महापालिकेच्या सिध्दार्थ रुग्णालय परिसरात कचऱ्याचे ढिगारे, नाल्याचे सांडपाणी, भंगार वाहने यामुळे दुर्गंधी पसरली असून येथे मच्छरांची पैदासही मोठया प्रमाणात वाढली असल्याने स्थानिक नागरिक व रुग्णालय प्रशासनाने अस्वच्छतेबाबत महापालिकेच्या पी.दक्षिण विभागाला लेखी तक्रार देऊनही कार्यवाही करण्यात दिरंगाई होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व सदर रुग्णालयाचा परिसर स्वच्छ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, स्वच्छ भारत अभियानांतर्गत रुग्णालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत येथील प्रशासन चालढकलपणा करत असून येथील प्रशासन व कर्मचारी यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अशा स्वरुपाच्या लेखी तक्रारी महानगपालिकेस प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, सिध्दार्थ रुग्णालय परिसर स्वच्छ ठेवण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- सदर रुग्णालयातील सफाई कामगारांमार्फत बाह्यरुगण, आंतररुग्ण व आवारातील स्वच्छता केली जाते.
- सदर रुग्णालयाच्या आजुबाजूच्या परिसराची साफसफाई दररोज करण्यात येते.
- सदर परिसरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यात येत असल्याने कचऱ्यांचे डबे काढून टाकण्यात आले आहेत. त्यामुळे सदर परिसरात कुठेही कचऱ्याचे ढिगारे आढळून येत नाहीत.
- सदर परिसरातील मोठया नाल्यांची साफसफाई दरवर्षी करण्यात येते.
- सदर परिसरात व रुग्णालयाच्या आवारामध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी महानगरपालिकेच्या किटक नियंत्रण विभागामार्फत नियमितपणे धुम्रफवारणी करण्यात येते.
- सिध्दार्थ रुग्णालयाच्या समोरील पोलीस प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या भूखंडावरील भंगार तसेच, मातीचे ढिगारे उचलण्याबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाला कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) शहरातील "समृध्दी कॉम्प्लेक्स" इमारतीमधील अनधिकृत बांधकामाबाबत

**(५०) * २६७५४ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) शहरातील "समृध्दी कॉम्प्लेक्स" या नावाने कमर्शिअल इमारत बांधून त्यात स्टोअर रुम व पार्कींगसाठी राखीव ठेवलेल्या जागेत कमर्शिअल गाळे बांधले असल्याने या इमारतीवर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी कणकवली नगरपंचायतीचे मा.नगरसेवक यांनी मुख्याधिकारी, कणकवली नगरपरिषद यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याप्रकरणी इमारतीच्या बांधकामात झालेल्या अनियमीततेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये विहीत केलेल्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्याबाबत मुख्याधिकारी, नगरपंचायत कणकवली यांना सुचित केले आहे.

तसेच जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित नगरसेवक यांच्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४४ अन्वये कार्यवाही करण्याचे सुचित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा घेतलेला निर्णय

**(५१) * २८६३७ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरातून निर्माण होणा-या घनकच-यापैकी ८०० मेट्रीक टन घनकच-यावर प्रक्रिया करुन त्यापासून वीज निर्मिती करण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन अभिकर्ता निश्चितीची प्रक्रिया करण्यात येवून, मे.एस्सेल इन्फ्राप्रोजेक्ट लि., मुंबई आणि हिताची झोसेन (इं.) प्रा.लि. (जे.व्ही.) यांचा प्रस्ताव नागपूर महानगरपालिका महासभा ठराव क्र.३८९ दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये स्वीकृत करण्यात आला आहे.
(२) व (३) नागपूर महानगरपालिकेच्या महासभेने घेतलेल्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही महापालिका स्तरावर सुरु आहे, असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

-----------------

## पुणे शहरातील नाले व कालवे सुरक्षित करणेबाबत

**(५२) * २८०५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या मध्य भागामधून वाहत असलेले नाले आणि कालव्यांच्या पात्रांमध्ये कोणत्याही सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्यामुळे हे नाले व कालवे मृत्यूचे सापळे बनत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नाले व कालव्यांवर कोठेही संरक्षित भिंत नसल्याने अनेक अपघात घडत असून यात निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नाले व कालवे सुरक्षित करणेबाबत, संरक्षित भिंत उभारण्यात अथवा संरक्षित जाळ्या बसविण्याच्या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या बेजबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहरातील अंबिल ओढ्यामध्ये टाकण्यात आलेल्या मलवाहिनीवरील मॅनहोल चेंबरमध्ये पडून वाहून गेल्याने दिनांक ७/१/२०१७ रोजी एका मुलाचे अपघाती निधन झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर ठिकाणी दुर्घटनेच्या एक दिवसापूर्वी जे.सी.बी. च्या सहाय्याने चेंबर फोडल्याचे व पाणी वळविल्याचे समजल्यामुळे संबंधीत जे.सी.बी. ऑपरेटरवर दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) कालव्याचा भाग हा प्रतिबंधीत क्षेत्र असते. तथापि, पुणे शहर हद्दीतील कालव्याच्या दोन्ही बाजुचे पुर्णत: नागरीकरण झालेले आहे. त्यामुळे अपघाताच्या अकस्मिक घटना घडतात.

तथापि नाले उथळ स्वरुपाचे असल्याने नाल्यामध्ये पडून अपघात होण्याचे प्रमाणात नगण्य आहे.

अशा घटना घडू नयेत याकरीता खालील उपाययोजना करण्यात येतात :-

- पुणे महानगरपालिकेमार्फत नाल्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून नाल्यांच्या दोन्ही बाजुला सुरक्षा भिंत बांधणे नाला विकसीत करणे अशा प्रकारची कामे हाती घेण्यात येतात.
- पुणे महानगरपालिकेमार्फत पुरसदृश्य परीस्थिती निर्माण होणाऱ्या ठिकाणी उपाययोजनांसाठी प्रकल्प अहवाल तयार केला आहे.
- सदर कालव्याच्या संरक्षणासाठी जलसंपदा विभागामार्फत कालाव्यावर सतत देखरेख करण्यात येते.
- नविन मुठा उजवा कालवा येथील निवडक ठिकाणी पुणे महानगरपालिकेमार्फत कालव्यांवर दोन्ही बाजुस लोखंडी संरक्षक जाळी बसविण्यात आल्या आहेत.

(३) या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(४) नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाची दुरवस्था दुर करणेबाबत

**(५३) * २७५४१ ॲड.निरंजन डावखरे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अस्वच्छता, अपुरी साधने, पुरेसे भूलतज्ञ डॉक्टर्स उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांवरील शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागल्याचे, त्याचप्रमाणे रुग्णालयात एमआरआय आणि सीटी स्कॅन मशीनची सुविधा देखील नसून तेथील ऑपरेशन थिएटरमध्ये झुरळांचा वावर असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ व दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या या रुग्णालयातील असुविधा व दुर्गंधीच्या वातावरणाबाबत नागरिक, रुग्ण व त्यांचे नातेवाईकांनी वारंवार महापालिका प्रशासन, मा.नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरमधील झुरळांच्या वावर प्रकरणी मा.महापौर, महापालिका ठाणे यांनी चौकशी करण्याचे आदेश दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉक्टरांच्या उपलब्धतेसह यासर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व तद्नुसार रुग्णालयातील दुरवस्था व कार्यपध्दती सुधारण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ऑपरेशन थिएटरमध्ये झुरळांचा वावर असल्याची बातमी वृतपत्रांमध्ये प्रसिध्द झाली आहे.

परंतु अस्वच्छता, अपुरी साधने, पुरेसे भूलतज्ञ डॉक्टर्स उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांवरील शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागल्या हे खरे नाही.

कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दिवसातुन तीन वेळा रुग्णालयाची साफ-सफाई करण्यात येते. तसेच शस्त्रक्रिया गृहांचे विहित पध्दतीने निर्जंतुकीकरण करण्यात येते.

रुग्णालयात साधन सामुग्री पुरेशा प्रमाणात असून आवश्यकतेनुसार विहित पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबविण्यात येते.

रुग्णालयात चार पुर्णवेळ भूलतज्ञ असून त्यांच्या मदतीला नऊ खाजगी भूलतज्ञांची नियुक्ती मानधनावर करण्यात आली आहे.

एम.आर.आय. व सीटी स्कॅन या सेवा रुग्णालयात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. परंतु ठाणे महानगरपालिका उक्त सेवा पी.पी.पी. तत्वावर सुरू करीत आहे.

(२) अशा तक्रारी निदर्शनास आल्या नाही.

(३) उक्त बातमी नंतर महापौर, ठाणे महानगरपालिका यांनी रुग्णालयास्तरावर चौकशी करण्याची सूचना दिली आहे, हे खरे आहे.

(४) अधिष्ठाता, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय यांनी केलेल्या अंतर्गत चौकशीत उक्त बातमीमध्ये तथ्य असल्याचे आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरारमधील शाळा-महाविद्यालयांमध्ये आईस्क्रीमच्या माध्यमातून अंमलीपदार्थाची विक्री होत असल्याबाबत**

**(५४) * २९२५९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरारमधील शाळा-महाविद्यालयांमध्ये आईस्क्रीमच्या माध्यमातून अंमलीपदार्थाची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “स्ट्रॉबेरी किक” नावाचा अंमलीपदार्थ आईस्क्रीममध्ये मिसळून त्याची विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आईस्क्रीमच्या आहारी विद्यार्थ्यांना लावून त्यांना अंमलीपदार्थ देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुप्रिम इंफ्रा.प्रा. लि. कंपनीच्या जनरल मॅनेजरने शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(५५) * २९१४३ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने भिवंडी-वाडा-मनोर या महामार्गाचे बांधकाम बांधा-वापरा-हस्तांतरण करा (बीओटी) या तत्वावर सुप्रिम इंफ्रा.प्रा.लि. या खाजगी कंपनीला सन २०१० साली दिले, सुप्रिम कंपनीने या रस्त्याच्या भूसंपादनाचे काम हाती घेऊन बाधित शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्याचे पैसे देण्याचे काम सुरु केले, मात्र कंपनीचे जनरल मॅनेजर मयूर जयंतीलाल आनम याने त्याच्या साथीदारांसह अनंगाव येथील राष्ट्रीयकृत बँकेच्या कर्मचा-याशी संगनमत करुन बोगस शेतक-यांना हाताशी धरुन ५ कोटी २८ लाख २७ हजार ६७४ रुपयांना फसविल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुंबईच्या पवई पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत फरारी झालेल्या बँक मॅनेजर व अन्य साथीदारांना पकडण्यात पोलीसांना यश आले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गुन्हेगारांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदरहू प्रकरणी पवई पोलीस ठाणेस एमईसीआर क्र.२/१६ कलम ४१८, ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२० (ब) ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणात एका बँक कर्मचाऱ्यास अटक केली आहे. तसेच दोन आरोपींनी मा.उच्च न्यायालयात अटकपूर्व जामरनासाडी अर्ज केला आहे व अन्य दोन आरोपीस मा.सत्र न्यायाधीश दिंडोशी यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे.

सदरहू प्रकरण तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर महानगरपालिकेची आर्थिकस्थिती सुधारण्याबाबत

**(५६) * २९१५९ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेचे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न घटल्याने महापालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत झाली असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विशेष निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सोलापूर महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार दिनांक १९/०१/२०१७ व त्यासुमारास महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत झाली असल्याचे स्वतंत्ररीत्या निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रुपये ५२८.०० कोटी एवढा महसूली इष्टांक असुन त्यापैकी रुपये १४७.११ कोटी इतके उत्पन्न सोलापूर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. याशिवाय स्थानिक संस्था कर अनुदान म्हणुन १२४.५६ कोटी इतका निधी सोलापूर महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

सोलापूर महानगरपालिकेमार्फत थकित मालमत्ता कर वसुलीची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून नगरोत्थान, रस्ते विकास, स्मार्ट सिटी, मुलभुत सोयी इत्यादी प्रकल्पांसाठी रुपये ३११.८० कोटी इतका निधी महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोरिवली एमआयडीसीतील फार्मा कंपनीतून ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने ड्रग्ज जप्त केल्याबाबत**

**(५७) * २६८४६ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोरिवली एमआयडीसीतील फार्मा कंपनीतून ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने १९ कोटीचे ड्रग्ज जप्त केल्याची घटना दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कंपनी प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, त्यांचेकडून, एकूण ७५९.९८० किलो वजनाचा रु.१९.०० कोटी किमतीचा अल्प्राझोलम व इतर अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. तपासामध्ये यापैकी दोन आरोपी हे सेंटॉर फार्मासिटीकल प्रा.लि., अंबरनाथ या कंपनीत कामगार असल्याचे व त्यांनी कंपनीतील मालाची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. या कंपनीमध्ये नार्कोटीक्समध्ये मोडणारे २७ प्रकारचे सायकोट्रॉपीक सबस्टन्स (ड्रग्ज) तयार केले जातात. सदर प्रकरणी चौकशी चालू असून, गुन्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवडी (मुंबई) येथील टी.बी. रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(५८) * २७६०५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी (मुंबई) येथील टी.बी. रुग्णालयात डिजीटल एक्स-रे मशीनसाठी सीएसआर मार्फत देण्यात आलेली रक्कम गेल्या दहा महिन्यांपासून बँकेतच पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील टी.बी. रुग्णाची संख्या वाढत असून सध्या पारंपारिक फिल्मवर एक्स-रे काढले जात असल्यामुळे रुग्णांवर उपचार सुरु करण्यासाठी विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाची मंजुरी मिळण्याकरिताची फाईल परळच्या एफ-दक्षिण वॉर्ड मधील अभियंता विभागाच्या कार्यालयाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रुग्णालयात अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शिवडी येथील टी.बी. रुग्णालयात सी.एस.आर. (CSR) अंतर्गत डिजिटल एक्स-रे मशीनची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी माझगांव डॉक व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार, माझगांव डॉक यांनी एकूण १ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला आहे.

त्यापैकी रु. १७.६४ लाख इतकी रक्कम त्यांनी दिनांक ३०/०७/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या कोषागरात जमा केली आहे.
(२) सदर रुग्णालयात पारंपारिक फिल्मवर एक्स-रे काढले जात असल्यामुळे रुग्णांवर उपचार सुरु करण्यासाठी विलंब होत आहे हे खरे नाही.
(३), (४) व (५) सदर रुग्णालयातील एक्स-रे मशिनसाठी आवश्यक असलेली स्थापत्य कामे करण्याचा प्रस्ताव दिनांक १९/०८/२०१६ रोजी एफ/दक्षिण विभागाच्या अभियंता कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.

तद्नंतर, दिनांक १६/११/२०१६ रोजी या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, माझगांव डॉककडून प्राप्त झालेला रु. १७.६४ लाख इतका निधी महानगरपालिकेच्या एफ/दक्षिण विभागाकडे या कामासाठी हस्तांतरीत करण्यात आला आहे.

स्थापत्य कामे १२ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केल्यानंतर डिजिटल एक्स-रे मशीन बसविण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

-----------------

## पुणे शहरात पीएमपीच्या सीएनजी बसेसना आग लागल्याबाबत

**(५९) * २६८२३ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात पीएमपीच्या तीन सीएनजी बसेसना आग लागल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुर्मान संपलेल्या बसेस पीएमपी प्रशासनाने चालू ठेवलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार बेजबाबदार पीएमपी प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ३०/८/२०१६ ते दिनांक ११/१/२०१७ या कालावधीत पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मालकीची एक बस व ठेकेदाराकडून भाडेतत्वावर घेतलेल्या तीन बसेसनी पेट घेतलेला होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत २०५५ बसेस चालविण्यात येत असून त्यापैकी ३२४ बसेसचे आयुर्मान संपले आहे.

सद्यस्थितीत महामंडळासाठी नवीन १५५० बसेस उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे. सदरच्या बसेस जसजशा प्राप्त होतील तसतशा जुन्या बसेस ताफ्यातून काढून टाकण्याचे महामंडळाने नियोजन केलेले आहे.

(३) उपरोक्त घटनांबाबत चौकशी मुख्य अभियंता, वाहतुक व्यवस्थापन, अपघात विभाग पुणे महानगर परिवहन महामंडळ यांचे मार्फत करण्यात आली असून बस उत्पादक कंपन्यांच्या अभियंत्यांना बोलावून घटनेबाबत विचारणा करण्यात आलेली आहे.

महामंडळाच्या बस क्रमांक सीएनजी -१७ मध्ये इंजिन बोनेटच्या आतील बाजूस इग्नेशन कॉईल जळाल्याने बसने पेट घेतल्याचे दिसून आले.

भाडेतत्वाच्या घेतलेल्या वाहनांच्या इंजिनमधून धूर येवून अचानक पेट घेतल्याचे दिसून आले आहे. याबाबत संबंधित पोलिस स्टेशनला तक्रारी दिलेल्या असून या वाहनांच्या ऑपरेटरनां नोटीस देऊन प्रत्येकी रुपये १०,०००/- चा दंड केला आहे.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा याकरीता आगार कार्यशाळांना तांत्रीक स्वरूपाचे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील महा-ई-सेवा केंद्र चालकांना चार वर्षांपासून मानधन मिळाले नसल्याबाबत

**(६०) * २९२७० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील महा-ई-सेवा केंद्र चालक सन २०१३ पासून आधार नोंदणीचे काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षे काम केल्यानंतरही त्यांना मानधन देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२), (३) व (४) अशी वस्तुस्थिती नाही. प्रत्येक यशस्वी आधार नोंदणीसाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून देय रक्कम CSC-SPV या नॉनस्टेट राजिस्ट्रारला व नॉन स्टेट रजिस्ट्रारकडून CMS Computers या संस्थेस दिली जाते. त्यानंतर देय रक्कम CMS संस्थेकडून संबंधीत VLE ला वर्ग केली जाते. CMS संस्थेकडून प्राप्त अहवालानुसार महा-ई-सेवा चालकांना या कालावधीत एकूण ४९.९२ लाख रक्कम अदा करण्यात आली आहे. महा-ई-सेवा केंद्र चालकांनी आधार नोंदणीच्या अनुषंगाने संबंधित नागरीकांकडून जमा केलेली कागदपत्रे (DMS records) भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणांकडे (UIDAI) जमा केलेली नसल्याने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या पत्र क्र. No.४(४)/५७/१९/QAP/२०१५-E&U-II (Vol-III) दिनांक २३rd December, २०१५ अनुसार दंड ठोठावला आहे. यामध्ये बायोमेट्रिक ऐरर, डेमोग्राफिक ऐरर व डिले पॅकेटकरीता ५६,९४,५८५/- इतक्या रक्कमेचा दंड ठोठावला आहे. अजुनही सुमारे २.५० लाख कागदपत्रे (DMS records) महा-ई-सेवा केंद्र चालकांनी जमा केलेली नाहीत. सदर कागदपत्रे (DMS records) लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना संबंधीत संस्थेने सर्व VLE (Village Level Enterpreneur) ना दिलेल्या आहेत.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत रमाई आवास घरकुल योजनेतील घरे बांधून देण्याबाबत

**(६१) * २९१२३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेला शासनाने रमाई आवास घरकुल योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ३ हजार घरे बांधण्यासाठी सन २०१० मध्ये सुमारे ५१ कोटी ७० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सहा वर्षामध्ये महापालिकेने फक्त ४८४ लाभार्थ्यांना घरे बांधून दिली असली तरी उर्वरित सुमारे दोन हजार घरे महापालिका कधी आणि कशी बांधणार याबाबतचा प्रश्न उपस्थित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेतील उर्वरित दोन हजार लाभार्थ्यांना त्यांची घरकुले बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे अशंत: खरे आहे.

सन २०१० ते २०१४ या कालावधीत औरंगाबाद महानगरपालिकेला रु.५१.२८ कोटी निधी देण्यात आला आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेकडून ३१७१ लाभार्थ्यांना रमाई आवास घरकुल योजनांतर्गत निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ५०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ७१६ घरकूलांचे काम प्रगतीपथावर आहे. निवड झालेल्या लाभर्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास तांत्रिक अडचणी उद्‌भवत आहेत. सदर अडचणी दूर करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(६२) * २६७६५ श्री.संजय दत्त, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक १४७२५ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजाला आरक्षण मिळण्यासाठी राज्यात आंदोलने व मोर्चे काढण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) वरील बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गातंर्गत १६ टक्के आरक्षण देण्याकरिता दिनांक ९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दिनांक १५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दिनांक १४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चेंबुर, वाशीनाका (मुंबई) येथे एम.एम.आर.डी.ए. च्या शाळेकरिता राखीव भूखंडावर अतिक्रमण करुन अनधिकृत पे ॲण्ड पार्किंग सुरु केल्याबाबत**

**(६३) * २६७९६ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर, वाशीनाका (मुंबई) येथे एम.एम.आर.डी.ए. च्या शाळेकरिता राखीव भूखंडावर अतिक्रमण करुन अनधिकृत पे ॲण्ड पार्किंग सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी ६० पेक्षा अधिक म्हाडाच्या इमारती असून लाखोच्या संख्येने असणाऱ्या लोकसंख्येच्या परिसरात महापालिकेची एकही शाळा नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर परिसरात महानगरपालिकेच्या आणिकगाव मनपा मराठी शाळा, आणिकगाव मनपा हिंदी शाळा, अयोध्यानगर मनपा मराठी शाळा, अयोध्यानगर मनपा तेलगू शाळा व माहुलगाव मनपा मराठी शाळा या शाळा आहेत.

(३) व (४) सदर भूखंडावरील अनधिकृत पे ॲण्ड पार्किंग हटविण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचना देण्यात येत आहेत.

-----------------

**शासकीय कार्यालयामध्ये पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबत**

**(६४) * २८५१२ श्री.कपिल पाटील, श्री.परिणय फुके, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५६८४ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा करण्याची मागणी राज्य शासकीय कर्मचारी संघटना, राजपत्रित अधिकारी संघटना आणि शिक्षक भारती यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांना रोज एक तासिका वाढवून पाच दिवसांचा आठवडा करण्याची मुभा यापूर्वीच देण्यात आली असून तसेच रोज ४५ मिनिटे अधिक काम करुन शासकीय, निम-शासकीय कर्मचाऱ्यांनाही पाच दिवसांचा आठवडा करण्याची मागणी होत आहे, मात्र त्याची अंमलबजावणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय दिनांक २९ एप्रिल, २०११ अन्वये, शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला किमान ३० तास अध्ययन करण्याचे धोरण ठरवून देण्यात आले आहे. शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये पाच दिवसांचा आठवडा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील नायगाव तसेच ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत**

**(६५) * २८२५५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.किरण पावसकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नारायण राणे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायगाव तसेच ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी माहे डिसेंबर, २०१६ च्या अखेरीस म्हाडामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून सदरील प्रकल्प सात वर्षात पूर्ण करण्याची अट या निविदेमध्ये असणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्विकासाबाबत बीडीडी चाळींमधील रहिवाशांना प्रशासनाने कोणतीही कल्पना दिली नसल्यास सर्व संघटना एकत्र येऊन या प्रक्रियेला विरोध करण्याची भूमिका घेणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, म्हाडाने नायगांव व ना. म. जोशीमार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळ पुनर्विकासासाठी दिनांक २८/१२/२०१६ रोजी जागतिक स्तरावर निविदा मागविल्या आहेत व सदरील निविदा कागदपत्रानुसार प्रकल्प सात वर्षात पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) व (३) बी.डी.डी. चाळींच्या स्थानिक रहिवाशासोबत मा.लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीत म्हाडाने दिनांक ०५/०१/२०१६, दिनांक २०/०१/२०१६ व दिनांक १६/०९/२०१६ रोजी संयुक्त बैठका आयोजित करुन बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत माहिती दिलेली आहे, असे उपाध्यक्ष, म्हाडा यांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## घाटकोपर (मुंबई) येथे वैद्यनाथ सहकारी बँकेच्या कारमधून नोटा जप्त केल्याबाबत

**(६६) * २७३७८ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपरच्या छेडानगर जंक्शन येथे वाहतूक पोलिसांनी बीड येथील वैद्यनाथ सहकारी बँकेच्या कारमधून वैद्यनाथ बँकेच्या १० कोटी १० लाख रुपयांच्या जुन्या व नवीन नोटा जप्त केल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणात जप्त केलेल्या नोटा पंचनाम्या अंतर्गत सिलबंद करण्यात येऊन याबाबतची माहिती अतिरीक्त संचालक आयकर विभाग (तपास), युनिट-७, ४ था माळा, सिंधीया हाउस, बेलार्डपिअर, मुंबई ३८ यांना देण्यात आली त्यानुसार आयकर विभागाने चौकशी करुन जप्त करण्यात आलेली रोख रक्कम ही परत पंचानामा करुन पंचनाम्या अंतर्गत अधिक चौकशी करिता ताब्यात घेतली. प्रकरणी या संदर्भात सेन्ट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टीगेशन (सीबीआय) मार्फत टिळकनगर पोलीस ठाणेस पत्र प्राप्त झाले वरुन वैद्यनाथ अर्बन को.ऑप.बँक लि. व इतर यांचे विरुद्ध RC-BA१/२०१६/A००३८ अन्वये भा.दं.वि. कलम १२०

(ब), ४२०, ४०६, ४७७ (ए) व भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १३ (१) (ड) व १३ (२) सह गुन्हा दाखल झाला आहे.

सदर प्रकरणी केंद्रिय अन्वेषण विभागाने केलेल्या मागणीनुसार सर्व मूळ कागदपत्रे त्यांना सूपूर्द करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास केंद्रिय अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरात स्वच्छ भारत अभियानाची पाहणी करण्यासाठी आलेल्या पथकातील अधिकाऱ्यास लाच घेताना अटक केल्याबाबत**

**(६७) * २८९७३ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात स्वच्छ भारत अभियानाची पाहणी करण्यासाठी आलेल्या पथकातील अधिकाऱ्यांनी महापालिका अधिकाऱ्याकडून लाचेची मागणी केल्याने अटक करण्यात आल्याची घटना दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री. शैलेश बजानिया, सिनियर ॲसेसर, न्यू स्टार, डॉट कॉम यांना दिनांक २२/०१/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून पोलिस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

**राज्यातील २७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकरिता केलेल्या यंत्र खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६८) * २६८४३ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **कौशल्य विकास व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी (आय.टी.आय.) सन २०१३-१४ या वर्षात ६८ यंत्रांची खरेदी करताना निविदेविना खरेदी करून त्यात अनियमितता झाल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमबाहय यंत्र सामग्रीच्या खरेदीची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सदर प्रकरणातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) (२) व (३) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत सन २०१३-१४ मध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी दरकरारपत्रावर करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीमध्ये अनियमितता झाल्याची बाब तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी प्रथम प्राथमिक चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नावासह परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सुचना संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना शासनामार्फत देण्यात आल्या आहेत.

-----------------

**नाटककार राम गणेश गडकरी यांचा पुण्यातील संभाजी उद्यानातील पुतळा काढून तो मुठा नदीच्या पात्रात फेकून दिल्याबाबत**

**(६९) * २६९०६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाटककार राम गणेश गडकरी यांचा पुण्यातील संभाजी उद्यानातील पुतळा काढून तो मुठा नदीच्या पात्रात फेकल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यातील आरोपींना अटक करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी उद्यान अधिक्षक यांनी दिलेल्या तक्रारीवरुन डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ०१/२०१७ भा. द. वि कलम १२०(ब), १५३(अ), ३७९, ४२७, ४४७, सार्वजनिक मालमत्ता हानी प्रतिबंधक कायदा १९८४ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व अटक आरोपी जामीनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगांव (मुंबई) येथील न्यायालयाच्या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७०) * २७५०५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील न्यायालयाच्या १७ मजली इमारतीच्या पुनर्बांधणी अद्याप पूर्ण झाली नसून या इमारतीच्या कामासाठी शासनाने रुपये ३८७ कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाला अद्यापपर्यंत दिले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निधी उपलब्ध करुन इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. माझगांव मुंबई येथे न्यायालयासाठी नवीन इमारत (G+१७ मजले) बांधण्याकरिता शासन निर्णय दि. ५ नोव्हेंबर, २०१५ अन्वये रु.३८७.०० कोटी इतक्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतीच्या बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २ मे, २०१६ च्या ज्ञापनान्वये रु.२९.४८ कोटी व दि. ९ फेब्रुवारी, २०१७ च्या ज्ञापनान्वये रु.२८.५२ कोटी असा एकूण रु.५८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर इमारतीच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय बंदरासाठी डी.पी.डी. पद्धत सुरु करण्याचा घेतलेला निर्णय**

**(७१) * २८११३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय बंदरात उतरणारा माल आणि बंदरातून परदेशात जाणारा माल याच्या मध्यभागी चालणारी कोणतीही यंत्रणा न ठेवता थेट डी.पी.डी. (डायरेक्ट पोर्ट डिलिव्हरी) ही पध्दत सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण (जि.रायगड) येथील जे.एन.पी.टी. बंदरातील गोडाऊनचे सर्व अधिकारी, सीएचए, एक्झीक्युटीव्ह, माथाडी, लेबर, सफाई कामगार असे सुमारे २५ हजार कामगार बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील छोटी दुकाने, रिक्षा, टेम्पो, ट्रेलर चालक-मालक यांचाही व्यवसाय ठप्प होणार असल्याने उक्त डी.पी.डी.च्या निर्णयाविरूध्द दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास जे.एन.पी.टी. बंदरावर आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) जे.एन.पी.टी. हे मोठे बंदर असून ते केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीकडून मुंबई व उपनगरातील अनेक भूखंडावरील आरक्षणे बदलण्यात आल्याबाबत**

**(७२) * २६७८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीकडून मुंबई व उपनगरातील अनेक भूखंडावरील आरक्षणे बदलण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील मोक्याच्या ठिकाणच्या जनतेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील आरक्षणे बदलण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशी बाब नाही.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई क्षेत्राची सुधारित प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये दिनांक २७/५/२०१६ रोजी पुनर्प्रसिध्द केलेली असून त्यावर नागरिकांच्या सूचना/हरकती बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन सुधारित प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर झालेनंतर शासनाकडून गुणवत्तेनुसार कार्यवाही संकल्पित आहे.

-----------------

## सँडहर्स्ट रोड (मुंबई) येथील हँकॉक उड्डाणपुलाबाबत

**(७३) * २६७५९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९६६६ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सँडहर्स्ट रोड या हार्बर लाईन रेल्वे स्थानकाजवळील हँकॉक पूल पाडून एक वर्ष पूर्ण झाले व अद्यापपर्यंत या पुलाखाली १८ जणांचा मृत्यू झाला तरी देखील या पुलाचे पुनर्बांधकाम महापालिका व रेल्वे प्रशासनाने संयुक्तपणे सुरु केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी रेल रोको आंदोलन करण्याचा प्रयत्न केला असता लोहमार्ग पोलीस, रेल्वे सुरक्षा व शहर पोलीस यांनी एकत्रितपणे कारवाई करुन सदर आंदोलन मोडीत काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलाच्या बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील सँडहर्स्ट रोड या हार्बर लाईन रेल्वे स्थानकाजवळील हॅकॉक पूल रेल्वेमार्फत ९ व १० जानेवारी, २०१६ रोजी तोडण्यात आला. तथापि मा.न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे पुनर्बांधणीचे काम अद्यापि सुरु झालेले नाही हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ताडवाडी माझगांव येथील स्थानिकांमार्फत स्वाक्षरी अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तद्नंतर महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना त्यांच्या मागणीबाबत निवेदन देण्यात आले. यानुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

(३) व (४) सदर पूलाच्या पुनर्बांधणीकरीता निविदा मागवून दिनांक ०६/०५/२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. तथापि, मा. उच्च न्यायालयाने सदर कंत्राट रद्द केल्याचा आदेश पारित केल्यामुळे महानगरपालिकेमार्फत पुनर्निविदेची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

सदर निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात कंत्राटदाराने दाखल केलेल्या याचिकेमध्ये नवीन कंत्राट देण्याकरीता दिनांक १७/०४/२०१७ पर्यंत स्थगिती देण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

----------------

## नागपूर महापालिका व नगरपरिषदांच्या अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(७४) * २८०४० प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिका व नगरपरिषदांच्या अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांना शासनाकडून अनुदान न मिळाल्याने माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१६ या दोन महिन्यांचे वेतन अदा झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षकांना वेतन न मिळाल्याने ते आर्थिक संकटात आले असल्याने शिक्षकांनी उपसंचालक कार्यालय येथे धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुदानित माध्यमिक शाळांना शासनाकडून अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शिक्षकांना वेळेवर त्यांचे वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षकांना तसेच अनुदानीत व विना अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना माहे डिसेंबर, २०१६ चे वेतन अदा झालेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, नागपूर महानगरपालिकेच्या अनुदानीत माध्यमिक शाळातील शिक्षकांच्या वेतनासंदर्भात शालार्थ प्रणालीतील माहिती नागपूर महानगरपालिकेकडून विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने, शासनाकडून अनुदान उपलब्ध झालेले नव्हते.

तद्नंतर शासनाकडून या प्रयोजनार्थ अनुदान उपलब्ध करुन दिल्यानंतर अनुक्रमांक ०१ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार, या शाळेतील शिक्षकांचे डिसेंबर, २०१६ अखेरचे वेतन अदा करण्यात आले आहे.

-----------------

**कोपरी, ठाणे (पूर्व) येथील महापालिका आरक्षित भूखंडावर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणेबाबत**

**(७५) * २७६८८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी, ठाणे (पूर्व) येथील श्री. बालनिकेतन शाळेजवळील भूखंड ठाणे महानगरपालिकेने प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणेकरिता आरक्षित ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडातील केवळ ३३ टक्के जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र उभारुन उर्वरित सर्व जागा खाजगी विकासकास देऊन बहुमजली इमारती उभारण्यात येणार असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आरक्षित असलेल्या या संपूर्ण भूखंडावर मुंबईच्या मत्स्यालय व नेत्रालयाच्या धर्तीवर सुसज्य असे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारावे अशी तेथील जनतेने मागणी करुन स्थानिक आरक्षण कृती समितीच्या वतीने बेमुदत धरणे, आंदोलन करुन दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.नगरविकास राज्यमंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, प्रधान सचिव, नगरविकास विभाग व आयुक्त महापालिका, ठाणे यांना निवेदने सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोपरी, ठाणे (पूर्व) येथील आरक्षित असलेल्या या संपूर्ण भूखंडावर अन्य कोणतेही बांधकाम न करता, प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

ठाणे शहराच्या मंजुर विकास आराखड्यानुसार मौजे कोपरी येथील सि.न.नं. ९९५, ११२५ व ११२० या भूखंडावर नियोजित १२ मी. रुंद डी.पी. रस्ता व प्राथमिक आरोग्य केंद्र यासाठी आरक्षित आहे.

(२) होय.

ठाणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार सदर आरक्षण विकसीत करण्याबाबत विकासक यांनी दाखल केलेल्या प्रस्तावास परवानगी दिलेली आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदने मा.राज्यमंत्री (नगर विकास) मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, प्रधान सचिव (नगर विकास) तसेच आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

परंतु आरक्षण कृती संघर्ष समिती यांचे निवेदन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नौपाडा यांचेमार्फत ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(४) शासनाच्या विहित मार्गदर्शक सूचनांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे क्षेत्रफळ योग्य आहे किंवा कसे तसेच डी.पी.रस्ता आरक्षण अबाधित आहे याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना या प्रकरणी सखोल चौकशी करुन चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सचूना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिठी नदीचा परिसर अतिक्रमण मुक्त करणेबाबत

**(७६) * २९२६० श्री.रविंद्र फाटक, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सर्वात मोठी नदी असलेल्या मिठी नदीच्या परिसरात अनधिकृत बांधकामे, कोणत्याही परवान्याशिवाय चालवली जाणारी भंगार दुकाने, गॅरेज, कारखाने उभारल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणासाठी गेल्या दहा वर्षात शेकडो कोटी रुपये खर्च करण्यात आले, परंतु हा खर्च पूर्णतः या अनधिकृत बांधकामे, कारखाने, गॅरेज, काठावरील गाळ यामुळे व्यर्थ ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नदीच्या परिसरात असलेली विकास आराखडयातील आरक्षणाच्या मोकळया जागापैकी एकही जागा शिल्लक नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नदीच्या किना-यावर असलेल्या झोपडयांचे पुनर्वसन व अतिक्रमण प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याचे जानेवारी २०१७ पूर्वीच निदर्शनास आले आहे.

(२) सदर कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रु. ६५९.८२ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

आतापर्यंत झालेल्या कामामुळे मिठी नदीच्या धारणक्षमतेत दुप्पटीने वाढ झाली असून, पाण्याच्या वहन / विसर्ग क्षमतेत तिपटीने वाढ झाली आहे. त्यामुळे हा खर्च पूर्णत: व्यर्थ ठरला आहे हे खरे नाही.

(३) महानगरपालिकेच्या एस विभागातील मिठी नदीच्या बाजुला सुमारे २० ठिकाणी आरक्षणे असून, त्यामधील ८ जागांवर अतिक्रमण आहे.

के/पूर्व विभागातील मिठी नदीलगत ११ ठिकाणी आरक्षणे असून एका जागेवर अतिक्रमण आहे.

एल विभागातील मिठी नदीलगत सुमारे २५ आरक्षित जागा असून त्यापैकी ४ जागांवर पूर्णत: व १४ जागांवर अंशत: अतिक्रमणे असून, ५ जागा विकसित केल्या आहेत व २ जागा मिठी नदीच्या रुंदीकरणामध्ये समाविष्ट झालेल्या आहेत.

(४) व (५) दिनांक २९ जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिठी नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या झोपड्यांचे पुनर्वसन व अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांना निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

**सोलापूर शहरातील झोपडपट्टयांचा विकास प्रलंबित असल्याबाबत**

**(७७) * २९१६६ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील सुमारे २२० झोपडपट्यांचा विकास प्रलंबित असल्याचे दिनांक २ फेबुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १९६ झोपडपट्यांचे सर्वेक्षण करुन याबाबतचा कृती विकास आराखडा तयार करुन शासनाकडे सादर करुनही याबाबतचा धोरणात्मक निर्णय न झाल्यामुळे केंद्र शासनाकडे पंतप्रधान आवास योजनेच्या निधीसाठी हा कृती विकास आराखडा सादर करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत सोलापूर शहरातील किती झोपडपट्टी प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे व उर्वरित प्रकल्पांना मान्यता देण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) केंद्र शासनाने शहरी भागासाठी केंद्र सहाय्यीत राजीव आवास योजनेची घोषणा सन २०११ मध्ये केली होती. सदर योजनेची (अ) पूर्वतयारी (ब) अंमलबजावणी असे २ टप्पे निश्चित करण्यात आले होते. जून २०११ ते जून २०१३ हा २ वर्षाचा कालावधी पूर्वतयारीचा होता.सप्टेंबर २०१३ मध्ये अंमलबजावणीच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात येऊन त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्रीय गृहनिर्माण व शहरी दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने

निर्गमित केलेल्या आहेत. राज्यातील ४६ शहरांचा समावेश करण्यात येऊन या योजनेअंतर्गत झोपडपट्टीमुक्त शहर आराखडा (Slum Free City Plan of Action) तयार करण्याचे काम सोलापूर महानगरपालिकेने हाती घेतले होते. त्याप्रमाणे सन २०१२ ते २०१४ अखेर झोपडपट्टयांचे प्राथमिक सर्वेक्षण करुन झोपडपट्टी मुक्त शहर कृती आराखडा म्हाडास सादर केला आहे.मात्र केद्र शासनाने दि.१९.५.२०१५ च्या पत्रान्वये राजीव आवास योजना बंद करण्यात येत असल्याचे कळविले आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | तपशील | एकूण झोपडपट्टी | क्षेत्रफळ | जागा मालकी | एकूण कुटुंब |
|---|---|---|---|---|---|
| १ | घोषित झोपडपट्टी | १५९ | १.७१ चौ.कि.मी | सरकारी-४२<br>मनपा-२६<br>खाजगी-९१ | ५०,०५७ |
| २ | अघोषित झोपडपट्टी | ६१ | ०.१७ चौ.कि.मी | सरकारी-०८<br>मनपा-०२<br>खाजगी-५१ | १०,३८७ |
| | एकूण | २२० | १.८९ चौ.कि.मी | सरकारी-५०<br>मनपा-२८<br>खाजगी-१४२ | ६०,४४४ |

उक्त एकूण २२० झोपडपट्टयांपैकी ४ झोपडपट्टयांचे सर्वेक्षण आयएचएसडीपी अंतर्गत करण्यात आले असून २० झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करण्यास तेथील रहिवाश्यांचा विरोध आहे. अशाप्रकारे १९६ (२२०-२४) झोपडपट्टयांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येऊन सदर झोपडपट्टयांचा प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत “सर्वांसाठी घरे शहर कृती आराखडा (HFAPoA) तयार करण्याचे काम सुरु असल्याचे आयुक्त, सोलापूर मनपा यांनी कळविले आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आजपर्यंत सोलापूर शहरातील १९ झोपडपट्टी प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीने शिफारस करुन अंतिम प्रस्ताव मंजूरीस्तव केंद्र शासनाकडे सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईत संक्रमण शिबिरात राहणाऱ्या मूळ भाडेकरुंना व घुसखोरी करणाऱ्या कुटुंबाना पंतप्रधान आवास योजनेतून सदनिका देण्याच्या निर्णयाबाबत**

**(७८) * २६८४७ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत संक्रमण शिबिरात राहणाऱ्या मूळ भाडेकरुंचे राहत्या ठिकाणी पुनर्वसन तसेच संक्रमण शिबिरात घुसखोरी करणाऱ्या सुमारे ८ हजार ५०० कुटुंबानाही पंतप्रधान आवास योजनेतून सदनिका देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक समिती-१५०९/प्र.क्र.८/२०१७/झोपसू-१, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ अन्वये संक्रमण शिबीरातील मूळ भाडेकरुंना पुनर्विकासामध्ये आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन सदनिका देणे तसेच संक्रमण शिबीरातील अनधिकृत रहिवाश्यांना पंतप्रधान आवास योजनेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी सर्वांसाठी घरे अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या निर्णयानुसार योग्य त्या सदनिका देण्यासाठी धोरण ठरविण्यासंदर्भात मा. मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बहुसंख्य महापालिका शाळांमध्ये इंटरनेट सेवा बंद असल्याबाबत**

**(७९) * २७६०३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बहुसंख्य पालिका शाळांमध्ये इन्टरनेट सेवा गेल्या सहा महिन्यांहून अधिक काळापासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमटीएनएल ब्रॉडबँड कडून घेण्यात आलेल्या प्लॅनच्या किंमतीपेक्षा अधिक बिल आल्याने लेखापाल विभागाने आक्षेप घेतल्याने इंटरनेट सेवा बंद असल्याची माहिती समोर आली आहे तसेच इंटरनेट सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे आय.एस.टी. सारख्या विषयाचा अभ्यास होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतील शिक्षकानाही शालार्थ व इतर कामांकरिता इंटरनेटची सुविधा गरजेची असल्याने त्यांना सायबर कॅफेमध्ये जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गेल्या सहा महिन्यांपासून बंद पडलेली इंटरनेट सुविधा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११५२ शाळांपैकी ५१० शाळांमध्ये इंटरनेट सेवा सुरु असून, ६३४ शाळांमध्ये देयकाची रक्कम विहित मर्यादेपेक्षा जास्त आल्याने इंटरनेट सेवा बंद आहे.
(२) महापालिकेच्या १४९ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना आय.सी.टी. या विषयाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. या सर्व शाळांमध्ये इंटरनेट सेवा सुरु असल्याने सदर विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिक्षकांना शालार्थ व इतर कामांकरिता जवळच्या विभागीय कार्यालयातील ए.बी.एम. युनिटमध्ये इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) बंद पडलेली इंटरनेट सुविधा सुरु करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना देयकाची थकीत रक्कम भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- देयकाच्या दंडाची रक्कम क्षमापित करण्यासंबंधी महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
- महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अमर्यादित इंटरनेट सेवा असून, विहित मर्यादेपेक्षा जास्त कॉल्स केल्याने देयकाची रक्कम मर्यादेपेक्षा जास्त आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कॉल्सची संख्या विहित मर्यादेत

ठेवण्याबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना देण्यात आल्या असून, या सूचनांचे उल्लंघन झाल्यास यापुढे संबंधितांकडून जास्त रकमेची वसुली करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील झोपडपट्टयांचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेद्वारे पुनर्विकास करण्याबाबत**

**(८०) * २६८२५ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ५५७ झोपडपट्टयांतील सुमारे २ लाख २६ हजार कुटुंबांपैकी फक्त ७ हजार कुटुंबांना गेल्या १२ वर्षात झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने (SRA) घरे दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडपट्टयांचा पुनर्विकास तातडीने व्हावा यासाठी एसआरए ने ब्ल्यू प्रिंट तयार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त झोपडपट्टयांचा पुनर्विकास व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ५५७ झोपडपट्टयांतील २,००,२६१ झोपड्यांकरीता झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र मार्फत २३८ योजना दाखल आहेत. त्यापैकी ४६ योजनांना अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे व ४ योजनांना अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून, ३६ योजनांचे बांधकाम चालू आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये आजपर्यंत ७६१० सदनिका बांधण्यात आल्या असून, त्यापैकी २०६१ सदनिका संक्रमण शिबीर म्हणून झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांच्या ताब्यात आहेत. तर ५५१५ सदनिकांचे वाटप पात्र लाभार्थ्यांना करण्यात आले आहे.

तसेच शासनाने, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणामार्फत पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रामधील झोपडपट्टयांचे निर्मुलन करण्याच्या अनुषंगाने व झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन व्हावे म्हणून केंद्र सहाय्यीत जेएनएनयुआरएम अभियाना अंतर्गत बी.एस.यु.पी. योजनेखाली ३२३९२ इतक्या घरकुलांच्या प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. यापैकी माहे जानेवारी २०१७ अखेर २०९०२ इतकी घरकुले पूर्ण झालेली आहे.

(२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु., नि. व पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३-अ (३) नुसार पुणे व पिंपरी चिंचवड मधील झोपडपट्टी पुनर्वसनाचा आराखडा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र कार्यालयाने दि.१०.०१.२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये तयार केला असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांनी कळविले आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या पदावर स्वतंत्र भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलदगतीने राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयाच्या ९८ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून मा.मुख्यमंत्री महोदयांनी मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात औषध फवारणीच्या नावाखाली चुकीचे बिले उचलण्याचा प्रयत्न करणा-यावर कारवाई करण्याबाबत

**(८१) * २९१२४ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात औषध फवारणीच्या नावाखाली ९ लाख ९७ हजार रुपयांचे बोगस बिले उचलण्याचा प्रयत्न करणा-या श्री.रामदास ठोंबरे या पेस्ट कंट्रोल मालकावर महापालिकेने फौजदारी गुन्हा दाखल केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मागील पाच ते सहा वर्षामध्ये श्री.ठोंबरे यांच्या वेगवेगळया एजन्सी मार्फत महापालिकेतून किती बिले उचलली याची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी डॉ.अर्चना राणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गु.र.नं. ११/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०,४६८ प्रमाणे दिनांक १४/०१/२०१७ रोजी व गु.र.नं. २८/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०,४६८, १२० (ब) प्रमाणे दिनांक ०३/०२/२०१७ रोजी योगिता रामदास ठोंबरे व इतर एका आरोपीविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गु.र.नं. २८/२०१७ या गुन्हयात १ आरोपीस अटक करुन ३ दिवस पोलीस कोठडी देण्यात आली होती. सद्यस्थितीत आरोपी जामिनावर असून सदर दोन्ही गुन्हयाचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**दक्षिण मुंबईमधील मशीद रेल्वे स्थानकाशेजारी दाणा बंदर परिसरातील गोदामाला भीषण आग लागल्याबाबत**

**(८२) * २६७७०** **श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईमधील मशीद रेल्वे स्थानकालगत दाणा बंदर परिसरातील गोदामाला लागलेल्या भीषण आगीमध्ये सुमारे १५ ते २० झोपडयांना आग लागून ६ मुले गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील आगीच्या दुर्घटनेत नुकसान झालेल्यांना कोणती मदत केली तसेच या आगीस कारणीभुत असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. दिनांक २३/०१/२०१७ रोजी सायं. ०६.०० चे सुमारास पत्र्याच्या झोपडयावर पतंग उडवितांना पतंग मस्जीद बंदर रेल्वे स्थानकावरील रेल्वेच्या ओव्हरहेड उच्च दाबाच्या विजेच्या तारेमध्ये अडकून दोन तारा एकत्र आल्यानंतर स्पर्श होऊन ठिणगी उडाल्याने पतंग उडविणारी ५ मुले भाजून जखमी झाली. तसेच सदर उच्च दाब विद्युत प्रवाह प्रवाहित होऊन जवळच्या गोदामातील जळाऊ सामानाला आग लागली व गोदामातील एल.पी.जी. गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन आजूबाजूच्या झोपडयांना आग लागली. जखमींपैकी

एक मुलगा गंभीर जखमी झाल्याने तो दिनांक ०१/०२/२०१७ रोजी मयत झाला. यावेळी परिसरातील झोपडया, परिसरातील चिजवस्तू व एक दुकान तसेच एक मोटार टेम्पो आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

(२) या घटनेच्या अनुषंगाने पायधुनी पोलीस ठाणे येथे अपमृत्यु क्रमांक ०९/२०१७, कलम १७४ भादंवि अन्वये नोंद घेण्यांत आलेली आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुलाच्या मृत्यूचे कारण septicaemia due to burn असे दिले आहे. इतर मुलांची प्रकृती सुधारल्याने त्यांना रुग्णालयातून सोडून देण्यात आले.

सदर ठिकाणी स्फोटकांमुळे आग लागली अगर कसे याबाबत रासायनिक विश्लेषक, कलिना, मुंबई यांचेकडे नमूना पाठविण्यांत आलेला असून त्याबाबतचा अहवाल येणे बाकी आहे. जखमींचे नातेवाईक तसेच इतर साक्षीदारांनी त्यांची कुठलीही तक्रार अगर संशय नसल्याचे जबाब दिले आहेत. सदर आगीमध्ये दुर्घटनाबाधितांचे सुमारे ४९,२०,०००/- इतके नुकसान झालेले आहे.

सदर दुर्घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने दुर्घटनाग्रस्तांना कोणतीही आर्थिक मदत अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आरे कॉलनी येथे मेट्रो-३ प्रकल्पासाठीच्या उभारण्यात येणाऱ्या कारशेडबाबत**

**(८३) * २६७९७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.अनिल परब, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनी येथे मेट्रो-३ प्रकल्पासाठी कारशेड झाल्यास मिठी नदीचे पाणी पावसाळयात चकाला व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात घुसून पूर परिस्थिती निर्माण होण्याची भिती कारशेडची जागा निवडण्यासाठी नेमलेल्या शासकीय समितीमध्ये दोन पर्यावरण तज्ञांनी शासनास सादर केलेल्या अहवालात स्पष्ट केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कारडेपोचा सुधारीत प्रस्ताव-१ आराखडा हा तज्ञ समितीच्या शिफारसीं नुसार व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जल वाहिन्या नियोजन व संशोधन विभागाच्या BRIMSTOWAD प्रकल्पाच्या मंजुरीनुसार बांधण्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांच्यामार्फत नियोजित आहे.

-----------------

**उकडवाही (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मॅटल्स लिमिटेड कंपनीने कामगारांना कामावरून कमी केल्याबाबत**

**(८४) * २७३३३ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उकडवाही (ता.उमरेड, जि.नागपूर) येथील टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मॅटल्स लिमिटेड कंपनीत अनेक वर्षापासून काम करणा-या नियमित ३५० कामगार व ६०० कंत्राटी कामगारांना कोणतीही आगावू सूचना न देता कामावरून कमी केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर कामगारांना कामावर सामावून घेण्याबाबत तसेच सदरील कंपनीवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स लिमिटेड, उकरवाही, ता.उमरेड, जि. नागपूर अंतर्गत कार्यरत असलेल्या टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स कंत्राटी मजदूर संघ या नोंदणीकृत संघटनेने, सदरहू आस्थापनेने त्यांचा स्पाज आयरन विभाग बंद करुन कामगारांना दि.३/८/२०१६ पासून कामावर घेणे बंद केले असल्याचे दि.७/९/२०१६ रोजी दिलेल्या निवेदनान्वये निदर्शनास आणुन दिले आहे, हे खरे आहे.

(२) टॉपवर्थ ऊर्जा अन्ड मेटल्स कंत्राटी मजदूर संघाच्या दि.७/९/२०१६ रोजीच्या निवेदना नुषंगाने चौकशी केली असता सदरहू आस्थापनेत सध्या २५० कर्मचारी व कामगार कार्यरत असून अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे कार्यालयाकडून उभयपक्षांना दि.५/१०/२०१६ ते दि.१७/२/२०१७ या कालावधीत विविध तारखांना चर्चेकरिता आमंत्रित करुन मध्यस्थी करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

दरम्यान दि.१७/२/२०१७ रोजी अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचेकडे झालेल्या बैठकीत माहे मार्च,२०१७ मध्ये कारखाना पूर्ववत सुरु झाल्यानंतर उर्वरित कामगार/कंत्राटी कामगार यांना प्राधान्याने व जेष्ठतेनुसार कामावर घेण्याचे व्यवस्थापनाने पत्राद्वारे आश्वासन दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### रेवस बंदराची (ता.अलिबाग, जि.रायगड) दुरवस्था दूर करणेबाबत

**(८५) * २६९१० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यामधील रेवस बंदरातून रेवस-भाऊचा धक्का (मुंबई) तसेच रेवस-उरण ही प्रवासी जलवाहतूक असून येथून दररोज हजारो प्रवासी प्रवास करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०३ वर्षाहून जुन्या असलेल्या रेवस बंदराची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असून या बंदरावर मूलभूत सोयीचा अभाव, लाकडी कार्यालये मोडकळीस आली असणे, प्रवासी बोट चालकांना गाळाची समस्या भेडसावत असून या बंदराची दुरुस्ती करण्याची मागणी तेथील प्रवाशी बोट चालकांनी मेरीटाईम बोर्डाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी प्रवासी कर २ रूपयांवरून वाढवून तो १० रूपये घेतला जात असून सदर ठिकाणी शासनाच्या सुविधांचा अभाव कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन अधिसूचना क्रमांक ममेबो/मुकाअ/ वाहतूक-२/२०१५, दिनांक १६/०९/२०१५ नुसार तिकीट दरावर आकारण्यात येणा-या प्रवासी करात सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे प्रवासी कराची आकारणी करण्यात येत आहे. रेवस येथील जेट्टी दुरुस्ती आणि पोच मार्ग, कार्यालयाचे बांधकाम, सोलर लाईट प्रवाशांसाठीच्या मूलभूत सुविधा पुरविणे या कामांचा समावेश महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या सन २०१६/६०१७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आला असून, त्याकरिता अनुक्रमे रु.१.९१ कोटी व रु.४.२८ इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. जेट्टी दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.